GOVERNMENT OF INDIA
NATIONAL LIBRARY, CALCUTTA.

Class No. Mar 891·463

Book No. ~~D1969 a~~ D239

N. L. 38.

MGIPC—S4—38 LNL/56—22-5-57—50,000.

...gpur.

....

1. *The time allowed for reading this book is* ONE MONTH:
2. *Only one Vernacular Book & one English Book can be issued at a time.*
3. *If damaged or defaced while in possession of a member the cost price will be recovered or if it is one of the volumes of a set of work which cannot be had from any Book seller separately, the entire work will be replaced at his cost.*
4. *If books are issued in a damaged state a note should be made of the facts at the time against the entry in the Ledger.*
5. *Members are particularly enjoined not to lend works to non-subscribers.*
6. *A member retaining a book beyond the time allowed will be debited with a detention charge of quarter anna per book per day, and if a report of the loss of the book is made after the time allowed to read, the detention charges as well as the cost price of the book will be recovered.*

S. V. L. Press, Khargpur.—5,000—18-6·35.

DBA000002838MAR

आजच्या कळ्या.

INDIAN INSTITUTE
N 2041
Date 20/2/1955
KHARGPUR

संपादक आणि प्रकाशकः
विश्वनाथ पांडुरंग दांडेकर बी. ए. (ऑनर्स)

AJAcHYA
KALYA

५ जून १९२७] किं. दहा आणे. [ज्येष्ठ शु. १५ शके. १८४९

मुद्रक:
श्रीनिवास केशव चित्रे बी. ए.
आत्माराम प्रिंटिंग प्रेस–बडोदें.

SHELF LISTED

NATIONAL LIBRARY
NO. 2838
DATE 17·9·57
CALCUTTA

I. N. INDIAN INSTITUTE ... KHARGPUR
2041
Date
Dest

प्रस्तावना

नव्या युगांत लघुकथा हा अत्यंत आवडता आणि महत्त्वाचा वाङ्मय–प्रकार होऊं पहात आहे. काव्यांत जें स्थान भावगीताला तेंच गद्यांत लघुकथेला. अमेरिकेच्या स्वातंत्र्यभूमींत मूळ लघुकथेचा जन्म झाला असला तरी आज सारें जग तिचें क्रीडास्थान बनलें आहे. आपल्या हिंदी वाङ्मयांतहि लघुकथेला स्थान मिळत आहे, ही मोठ्या आनंदाची गोष्ट होय.

पण तिचा व्हावा तितका प्रसार अजून झाला नाहीं. पुष्कळांना लघुकथा म्हणजे लहान मुलांकरितां लिहिल्या जाणाऱ्या गोष्टी वाटतात. कलेच्या दृष्टीनें लघुकथेची काय योग्यता आहे, हें त्यांना माहित नसतें. लघुकथेचा वाचक सुशिक्षीत असावा लागतो. लेखकाप्रमाणें त्याचेंहि अन्तःकरण काव्यमय असावें लागतें. लघुकथेचे मुग्धविलास येरव्हीं त्याला समजायचें नाहींत.

गतवर्षी लघुकथेचा मुद्दाम अभ्यास करीत असतांना, शक्यतर मराठींत हा वाङ्मय प्रकार रूढ करावा असें मनांत आलें. आणि ईश्वरकृपेनें संकल्पसिद्धिहि लवकरच झाली. प्रस्तुत उपक्रमाची योग्यायोग्यता ठरविणें हें वाचकांचें कार्य होय.

पुस्तकांत क्वचित् चार दोन ठिकाणीं मुद्रणदोष राहिले आहेत. पण त्याबद्दल विचक्षण वाचकवर्ग स्वानुभवावरून संपादकाला क्षमा करील अशी आशा आहे.

शेवटीं आभार मानावयाचें काम राहिलें. बडोदा कॉलेजचे विद्वान प्रो. चिंतामण विनायक जोशी यांनीं आपल्या नेहमींच्या

गोड स्वभावानुरूप मुद्रितें तपासण्याचें कबूल करून त्याप्रमाणें तीं लक्षपूर्वक तपाशिलीं त्याबद्दल त्यांचें साहित्य-विकासक मंडळाच्या-वतीनें मी मनःपूर्वक आभार मानितों. त्याचप्रमाणें आत्माराम प्रिंटिंग प्रेसच्या चालकांनीं व्यवस्थितपणें काम करून दिल्याबद्दल त्यांचेंहि आभार मानणें जरूर आहे.

ज्येष्ठ शु. [५ शके १८४९] संपादक

आजच्या कळ्या

कळी १ ली

कादंबिनीचा केवडा—

RY. INDIAN INST
No. 2041
Date
KHARGPUR

—१—

" अगबाई ! मीं इथें ठेवलेला केवडा गेला तरी कुठें ? "

किती तरी गोड हे शब्द ! सूर्योदय नुकताच झाला होता. सूर्याचीं कोवळीं किरणें नर्मदेच्या पाण्याशीं क्रीडा करीत होतीं. पोहण्याच्या उद्देशानें मी नर्मदेवर चाललों होतों. इतक्यांत माझ्या कानांवर वरील मधुर शब्द पडले. मी जागच्या जागींच थबकलों. दोन समवयस्क तरुणी नुकत्याच, स्नान उरकून, आपापलीं वस्त्रें नेसीत होत्या. मी बालीश वृत्तीनें नर्मदेच्या प्रवाहाकडे पाहूं लागलों. इतक्यांत पुनः मर्धाचा गोड ध्वनि मला एकू आला. अगदीं अनोळखीच्या प्रदेशांत भिरभिर भटकत असतांना एकाएकीं पूर्वस्मृति जागृत करणारी मुद्रा दिसावी, क्षणभर मधुरसंभ्रमांत माणसानें सांपडावें, चित्तवृत्ति बावरल्यासारखी व्हावी, त्या व्यक्तीची ओळख पटण्याकरितां तिनें चार शब्द बोलावे असें मनांत यावें, आणि नेमकें त्याच वेळीं त्या व्यक्तीनें आपल्याशीं बोलावें; म्हणजे जो कांहीं आनंद होतो तसा मला आतां झाला. लहानपणीं जो अवाज नेहमीं ऐकूं येई, तोच पुनः ऐकण्याची आज किती तरी वर्षांनीं संधि मिळाली. मन म्हणालें आतां शंका नको. हा कादंबिनीचाच अवाज. हातीं स्वर्ग आल्यासारखें वाटलें.

" हा अस्सा चंद्रकळेवर ठेवला होता. गेला तरी कुठें बाई ? "

" कादंबिनी, असेल हो इथेंच कुठें तरी. जाणार होता कुठें ? इथें कोणी आलें नाहीं, कांहीं नाहीं. नीट पाहा. इतक्यांतच कुठें तरी असेल. वाऱ्यामुळें उडला असेल. "

" पाहिलं चोहींकडे. कांहीं सांपडत नाहीं. माझा केवडा किती तरी छान होता. "

" केवड्याकरितां इतकं वाईट नको कांहीं वाटायला. घरीं गेल्यावर दुसरा मिळेल. कोणीं पाहिलं तरी काय म्हणेल ? जणुं काय केवड्यावरच तुझें जीवन अवलंबून आहे ! लोक तुला वेडी ठरवितील."

" तुला आपली थट्टाच करायची असली तर खुशाल कर. घरीं गेल्यावर दुसरा केवडा मिळेल. परंतु हा तर हातचा गेलाना ? सखु माळिणीच्या मुलीनें मला तो अगदीं सकाळीं आणून दिला होता. तिनें येवढ्या प्रेमानें आणून दिलेला केवडा मीं माझ्या हलगर्जीपणामुळें हरवला म्हणून मला वाईट वाटतें.

" सांपडतच नाहीं, तिथं वाईट वाटून काय करणार ? कादंबिनी, तुझं मन फारच कोंवळं आहे बाई ! पुन्हां तुझे डोळे पाण्यानें भरले.... "

इतक्यांत झाडावर पक्ष्याच्या पंखांचा अवाज झाल्यामुळें मीं वर पाहूं लागलों. माझ्या जवळून एक घार आकाशांत तिरकस उंच उडाली. घारीच्या पंखांचा वारा लागल्यामुळें तेवढ्यांतच मला आनंद झाला. पुनः मीं वाळवंटाकडे नजर फिरविली. परंतु मघाच्या तरुणी तिथें नव्हत्या. कांठाकांठानें त्या बऱ्याच दूरवर जात असलेल्या दिसल्या. मनानें थोडीशी माघार घेतली. कादंबिनीशीं आज इतक्या वर्षांनीं आलेली बोलण्याची संधि वायां गेली. नर्मदेवरील वातावरण निःशब्द झालें. नर्मदेच्या प्रवाहांत मात्र कुठें कुठें तरंग उसळूं लागले

होते. वृक्षराजींतून वाहणारा वाराही कांहीं अस्फुट बोबडे बोल बोलत होता.

× × × ×

—२—

" आपल्याला माझा केवडा सांपडला म्हणतां ? कुठें आहे ? पाहूं....खरंच ! कुठें सांपडला ? "

संध्याकाळची वेळ. अस्तास जाणाऱ्या सूर्याचें बिंब नर्मदेच्या पाण्यावर पोहत होतें. नित्य परिपाठाप्रमाणें मी नर्मदेवर फिरायला म्हणून आलों होतों. इतक्यांत कांहीं वेळानें पाण्याच्या जवळून कादंबिनी मला जातांना दिसली. मीं पुढें जाऊन केवड्यासंबंधीं सर्व हकिकत तिला कळविली. ती ऐकून झाल्यावर ती म्हणाली " आश्चर्यच आहे बाई ! इतक्या जवळ पडलेला केवडा आम्हांला कसा दिसला नाहीं ? "

" त्यांत आश्चर्य कसलें ? केवडा दरडीखालीं असल्यामुळें तुम्हांला दिसला नसेल. शिवाय त्या जागेवर पाचोळाहि बराच पडला होता. मी पोहायला म्हणून पाण्यांत उतरणार, इतक्यांत माझी नजर दरडीकडे जाऊन मला तो दिसला. हा बघा. हाच ना तो ? " असें म्हणत सकंप हस्तानें मीं केवडा कादंबिनी जवळ दिला. कादंबिनीची वृत्ति देखील संभ्रमित दिसली. माझ्या हातांतून केवडा घेत असतांना फारच मोहकपणें तां हंसली. थोडा वेळ आमच्यापैकीं कोणींच कांहीं बोललें नाहीं. अगदीं शांत मनानें कादंबिनी केवड्याकडे पाहात होती. मधून मधून तिचे ओंठ स्फुरल्यासारखे वाटत होते. " एकाएकी कादंबिनी म्हणाली , " मीं आपल्याला ओळखलें. आई बरोबर आजोळीं असतांना लहानपणीं आपण...."

" हो, हो. माझी स्मृति अगदीं कायम आहे. इतक्या लवकर

ओळख पटली हें भाग्यच समजतों....मला येथें येऊन आठ दिवस झाले. आज अचानक आपली भेट झाली. ”

नर्मदेचा प्रवाह संथपणें वाहात होता. कांहीं सारस पक्षी कांठावर बसून गात होते; कांहीं प्रवाहाच्या वर—पुरुष दोन पुरुष उंच—आकाशांत स्थिरतेनें तरंगत होते; व कांहीं पाण्यांत उड्या मारीत होते. नर्मदेच्या प्रवाहावरून वारा गेल्यामुळें तिचें अंग थरथरल्यासारखें दिसूं लागलें. कांठावरील खडे गोळा करून मी नर्मदेंत टाकूं लागलों. इतक्यांत आपलें सारें शरीर फिरवून कादंबिनी माझ्याकडे पहात म्हणाली, “ आपण इकडे दररोज फिरायला येतां वाटतें ? पाण्यांत खडे टाकल्यानें मोठी मौज वाटतें नाहीं ? तेवढ्यांतच नर्मदेवर तरंग नाचूं लागतात. आपल्या सहवासांत माझीहि स्थिति ह्या नर्मदेप्रमाणें झाली आहे. ”

मी कादंबिनीकडे बघूं लागलों. फारच शांतपणें माझ्या नजरेला नजर मिळवून कादंबिनी माझ्याकडे बघत होती. तिच्या नजरेंत तिच्या हृदयाचें चित्र सांठविलें होतें. माझ्यासमोर कोणी तरी पावित्र्याची मंगलमय मूर्तीच उभी असल्यासारखें मला वाटलें. आम्ही एकमेकांशीं न बोलतांनाहि आमची अन्तःकरणें कांहीं अनिर्वचनीय तत्त्वांनीं पूरित होत होतीं. कांहीं वेळानें कादंबिनी पुनः बोलूं लागली. ती म्हणाली “ आपणांस माझी एक विनंती आहे....”

“ मला ? आणि ती कसली विनंती ? ”

“ आपण हा केवडा आपल्याजवळच ठेवावा. माझी खूण.... माझी.... ....आठवण म्हणून.... ....हा घ्यावा ....अगबाई ! चंद्रोदय झाला वाटतं ? बराच उशीर झाला मला....बरं आतां येतें हं...”
असें म्हणत व आपल्या गोड नजरेनें माझ्याकडे बघत शुभ्र चांदण्यांत

कादंबिनी कुठल्या कुठें दिसेनाशी झाली. तिनें दिलेला केवडा चंद्रप्रकाशांत चकाकत होता. त्या केवडयाचें चुंबन घेत मी म्हणालों, " कादंबिनी.........कादंबिनी. "

× × × ×

—३—

दुसऱ्या दिवशीं सोमवार होता. देवपूजेला केवडा मिळावा म्हणून मी मोठया सकाळीं उठून केवड्याच्या बनांत गेलों. प्रत्यक्ष बनांतील व वाटेवरील निसर्गशोभा कांहीं अवर्णनीय होती. आकाशांतील लाजाळू तारका लपंडावाचा खेळ खेळत होत्या. झाडावर बसून पक्ष्यांनी भूपाळया म्हणायला सुरवात केली होती. माझ्या हृदयस्थ राम ह्या संगीतानें संतुष्ट झाला. माझें शरीर हवेबरोबर हेलकावे खाऊं लागलें. प्रत्येक वस्तु मला दिव्य संदेश सांगूं लागली. गवताच्या झोल्यावर झुलणाऱ्या फुलांत, फुलांवर नाचणाऱ्या दंवांत, दंवाभोंवतीं घिरटया घालणाऱ्या फुलपाखरांत, फुलपांखराच्या पंखावर चकाकणाऱ्या सूर्यकिरणांत—साऱ्या विश्वांत मला सौंदर्य, प्रेम व भक्तीचें अधिष्ठान दिसूं लागलें. आनंदातिशयानें मी स्वतःच्या मनाशींच कांहीं स्वर गुणगुणत केवड्याचा एक कुंज टाकून पुढें गेलों. इतक्यांत झुळुझुळु वाहणाऱ्या ओढ्याप्रमाणें एक हास्यलकेरी मला ऐकूं आली. पलीकडच्या कुंजांतून एका मुलाला हाताशीं धरून कादंबिनी आपल्या मैत्रिणीसह येत होती. मी कादंबिनीला दिसत नव्हतों. केवडयाच्या वनांत कादंबिनी एखाद्या वनदेवतेप्रमाणें स्वैरसंचार करीत होती. तिची मैत्रीण मुलाला घेऊन फुलें आणण्याकरितां दुसऱ्या वनांत गेली. मी जागच्या जागींच उभा होतों. थोड्या

वेळानें कादंबिनी मी होतों तिथें आली. आम्ही दोघेंहि एकमेकांकडे पाहून हंसलें. एक नाजुक केवडा आपल्या अंबाड्यावर खोवीत कादंबिनी म्हणाली, " फिरायला म्हणून इकडे आलांत वाटतें ? "

" केवडा घेण्याकरितां आलों होतों. पण त्यांत फिरणें देखील झालें. "

" ह्या वनांतील केवडे फारच छान आहेत. नाहीं ? "

" होय. पण काल तूं दिलेल्या केवड्याची सर या वनांतील केवड्यांना येणार नाहीं. नाहीं ? "

" तें मी काय सांगूं बाई ? " असें म्हणत असतां तिचा सर्व कपोलप्रांत लज्जेनें व्याप्त झाला. कादंबिनी जमिनीवरील एका फुलाकडे बघूं लागली. थोडा वेळ आमच्यापैकीं कोणींच कांहीं बोललें नाहीं. नंतर मी म्हणालों, " कादंबिनी ...."

कादंबिनी आपल्या शांत नजरेनें पुनः माझ्याकडे पाहूं लागली.

" कादंबिनी, तूं माझी होशील कां ? "

कादंबिनी जमिनीकडे बघूं लागली. पुनः ती लाजल्यासारखी दिसली. जमिनीकडे बघत ती म्हणाली, " मी काल संध्याकाळपासूनच स्वतःला आपली म्हणवितें. आपणच मला आपली म्हणाल किंवा नाहीं याविषयीं शंका होती. आईची इच्छा लवकरच तृप्त होणार म्हणावयाची. " इतक्यांत पुनः मघाच्या लहान बालकाचा हास्यध्वनि आम्हाला ऐकू आला. " ताई-.....ताई.... " म्हणत तो मुलगा आम्ही उभे होतों त्या कुंजाजवळ येऊं लागला. कादंबिनीची मैत्रीण हातांत फुलांची परडी घेऊन मागाहून येत होती. तिला पाहतांच कादंबिनी माझ्याकडे गोड डोळ्यांनीं बघत तेथून गेली.

कादंबिनी गेल्यावर केवड्याच्या कणसांशीं खेळत असलेल्या वाऱ्यानें गाणें म्हणायला सुरवात केली.

× × × ×

—४—

मध्यंतरीं सात आठ दिवस गेले. या अवधींत माझी व कादं-बिनीची तीन चार वेळां भेट झाली असेल. प्रत्येक प्रसंग अधिक सुखानें, अधिक सौंदर्यानें व अधिक सत्यनिष्ठेनें नटलेला असें. जसजसें दिवस जाऊ लागले तसतसे आम्ही एकमेकांच्या अधिका-धिक जवळ येऊं लागलों. अगदीं एकमेकांना एकमेकांखेरीज करमे-नासें झालें. आमचे विचार, आमच्या भावना, आमच्या आकांक्षा एकाच ध्येयसिद्धीसंबंधीं असत. आमच्या अन्तःकरणांतून एकाच रागदारीचें दिव्य संगीत स्रवूं लागलें. आमच्या समोर एकाच प्रेम-स्वरूप परमेश्वराचें अधिष्ठान होतें. त्या सकलव्यापी मूर्तीच्या पुढें आम्ही आमच्या हृदयांतील भक्तीचा धूप उजळूं लागलों. द्वैतांतून आम्ही अद्वैताचे उपासक बनलों. सारें जग आमच्या हृदयांत व आम्ही साऱ्या विश्वाच्या हृदयांत आहोंत, असें वाटूं लागलें. जिकडे पहावें तिकडे एकच आनंदी आनंद! सौंदर्यानें सजलेल्या आमच्या सृष्टीवर संगीताचेच सुखकर वारें वाहात होतें. आमच्या सद्भाग्या-बद्दल आम्ही ईश्वराला धन्यवाद देऊं लागलों. परमेश्वर किती तरी प्रेमळ आहे! आम्ही आमच्या देहरूपी सतारीच्या तारा त्याचें गुणा-नुवाद गाण्याप्रीत्यर्थ छेडूं लागलें. परंतु आमच्या सतारींतून प्रेमाचींच गाणीं निघत असत. देवाला देखील प्रेमकथाच ऐकाव्याशा वाटतात!

दोन दिवसांपूर्वीं मी व कादंबिनी एकमेकांना एकमेकांच्या सुख-

दुःखाच्या गोष्टी सांगत, वाळवंटावर बसलों होतों. आम्ही अगदीं तल्लीन झालों होतों. इतक्यांत आमच्या सतारीची एक तार तुटली. कादंबिनीची मैत्रीण घाबऱ्या घाबऱ्यानें येऊन कादंबिनीला "ताई" म्हणणारा तिचा धाकटा भाऊ एकाएकी आजारी झाल्याचें सांगून गेली. कादंबिनीचे डोळे अश्रूंनीं भरून आले. ती आपल्या घरीं गेली.

मी तसाच शोकमग्न परिस्थितींत घरीं परतलों. त्यानंतर सात आठ दिवसांनीं आज सकाळीं कादंबिनी भेटली. तिच्या भावाची प्रकृति आतां थोडी बरी आहे. कादंबिनीचा चेहेरा अगदीं उतरलेला दिसत होता. ' रात्रीं होणाऱ्या जागरणामुळें अलीकडे माझ्या प्रकृतीला बरें नसतें. पण मधुची (धाकटाभाऊ) तबियत बरी होते आहे, ही त्यांतल्यात्यांत समाधानाची गोष्ट आहे. '—असें ती म्हणाली. तिनें आज संध्याकाळीं नर्मदेवर येण्याचें कबूल केल्यामुळें मी उत्सुकतेनें तिची वाट पहात उभा होतों. तिन्हीसांजा होऊन नर्मदेच्या तटावर शून्य दिसूं लागलें. नर्मदेचा प्रवाह हळुहळू रेंगाळत चालला होता. कादंबिनीला प्रिय असलेल्या शुक्राच्या चांदणीचा पश्चिमेकडे उदय देखील झाला. परंतु मला प्रिय असलेल्या माझ्या चांदणीचा उदय होण्याचें चिन्ह दिसेना ! ! मन म्हणालें ' कादंबिनी आजारी तर नसेलना ? '

× × × ×

—५—

एखादें उत्तम तंतुवाद्य असावें, पण वाजविणाराच जागेवर नसावा ! मग त्या वाद्याची जशी दीनवाणी स्थिति होते तशी शोचनीय अवस्था माझी झाली. माझ्या शरीरांतील हुरूप कमी कमी होऊ

लागला. ज्या प्रकाशांत मी वावरत होतों तोच प्रकाश एकाएकीं नाहींसा झाला. कादंबिनीची व माझी भेट गेल्या सबंध आठवड्यांत झाली नाहीं. माझ्या देहांतील सारसर्वस्व नाहींसें होऊं लागलें असा-वेंसें मला वाटलें. आज सकाळीं कादंबिनीसंबंधीं विचार करीत असतां तिची मैत्रीण वैवाला बरोबर घेऊन कादंबिनीच्या घरीं जात असतांना मला दिसली. कादंबिनीला विषमाचा ताप येत होता. विषमाचा ताप भयप्रद असतो हें मला माहीत होतें. माझ्या हृदयाला चरका बसल्यासारखें झालें. कादंबिनीला भेटावेंसें कितीतरी वेळां मला वाटलें. मी भेटण्याचा निश्चय देखील केला. पण पुनः मनानें माघार घेतली. विवेकबुद्धि म्हणाली, ' तुझें भेटायला जाणें योग्य ठरणार नाहीं ! लोक तुला काय म्हणतील ? ' माझा आणि कादंबिनीचा कशा प्रकारचा संबंध होता, हें तिच्या वडिलांना अजून पर्यंत माहीत नव्हतें. तेव्हां माझ्यासारख्या तरुणानें अत्यवस्थ स्थितींत असलेल्या एका अविवाहित तरुणीला भेटायला जाणें, हें मेंढरांप्रमाणें परप्रत्यय-नेयबुद्धि असलेल्या बहुजनसमाजाच्या सोंवळ्या दृष्टीला कसें खपणार ? माझ्या हृदयाला या दुःखाची जखम होऊन तींतून रक्तस्राव होत असलेला एकवेळ समाजाला बघवेल ! फार काय या माझ्या सद्वर्तना-बद्दल समाज माझें कौतुक देखील करील ! परंतु आमचीं अन्तःकरणें एकमेकांच्या दर्शनाकरितां कासावीस होत असलीं तरी कादंबिनीला—मृत्युशय्येवर पडलेल्या माझ्या प्रियेला—माझ्या सारख्यानें भेटायला जाणें हें समाजाला खपलें नसतें !! समाजरूपी रंगभूमीवर ज्यांना चांगलें नाटक रंगवितां येतें, त्यांचाच निभाव लागतो ! तुमचें अन्तःकरण, तुमचे विचार, तुमचे संकल्प, तुमच्या नीतिविषयक

कल्पना किती जरी उज्ज्वल असल्या तरीं त्याची समाजाला काय किंमत ? तुम्ही उत्तम नट आहांत किंवा नाहीं, येवढेंच समाजाला बघावयाचें असतें ! तेवढ्या पुरती तुम्हाला समाजाच्या डोळ्यांत धूळ फेंकतां आली कीं, मग वाटेल तसे वागायला समाज तुम्हाला स्वखुषीनें परवानगी देईल ! परंतु तुम्ही कितीहि शुद्धचरित असलांत तरी अप्रयोजक चालीरीतींत अणुरेणु इतकाहि बदल करण्याचा तुमचा विचार लोकांना कळला पुरे—सारा समाज गांधिलमाशांप्रमाणें तुमचें डोकें हुळहुळें करील. कारण हा समाजधर्म आहे ! समाजाचें अस्तित्व व महत्व याच गोष्टीवर अवलंबून आहे ! ! माझा एकटयाचाच जर हा प्रश्न असता तर समाजबंधन मीं झुगारून दिलें असतें. पण माझ्या बरोबर इतरांना—विशेषतः कादंबिनीला—झळ लागण्याचा संभव असल्यामुळें, मी माझा भेटायला जाण्याचा बेत पूर्ण विचारानें रहित केला.

इतक्यांत माझ्या दारावरून पुनः कादंबिनीची मैत्रीण गेली. मीं तिचें मत काय तें पहावें म्हणून तिला माझी कादंबिनीला भेटायाची इच्छा कळविली. मैत्रिणीला आमचा संबंध माहीत होता. तिनें कांहीं वेळ विचार करण्यांत घालविला; व एकदम कांहींसें आठवल्यासारखें करुन ती म्हणाली, "पण बाई लोक काय म्हणतील ? ?" मैत्रीण पुढें चालती झाली. मी स्वतःच्या मनाशींच पुटपुटलों, "पण बाई लोक काय म्हणतील ? पण बाई लोक काय म्हणतील !"

× × × ×

—६—

रात्रभर माझ्या डोळ्याला डोळा कसा म्हणून तो लागेना. मी आपल्यां मनाशींच विचार करीत पडलों होतों. पहाटे थोडीशी मला

झोंप लागली. पण ती देखील स्वस्थ नव्हती. झोंपेंतच वाईट स्वप्नें पडूं लागलीं. रात्र कशीबशी मी संपविली. दुसरा दिवस उजाडला. सूर्याचीं कोवळीं किरणें माझ्या खिडकीवाटे भिंतीवर नाचूं लागलीं. परंतु त्यामुळें माझ्या मनाला आनंद झाला नाहीं. माझें शरीर जड झाल्यासारखें मला वाटलें. मी खिडकीवाटे बाहेर बघूं लागलों. सारें जग अमंगल गाणीं गात असल्याचा मला भास झाला. आकाशांत निस्तेज दिसणाऱ्या चंद्राकडे पाहून मला वाईट वाटलें. इतक्यांत माझ्या दारावरून एक स्मशानयात्रा जाऊं लागली. कादंबिनीचे वडील सर्वांच्या पुढें होते. माझें अमंगल स्वप्न खरें ठरलें ! जें नको दिसायला तें दिसलें ! कादंबिनीचा देह मागाहून तिरडीवर नेण्यांत येत होता. आज पंधरा दिवसानंतर माझ्या कादंबिनीचें मला दर्शन झालें ! आणि तें अशा स्थितींत ! ! अश्रूंचीं कोमल पुष्पें कादंबिनीप्रीत्यर्थ मीं उधळिलीं. कादंबिनी दिसेनाशी झाली. मी म्हणालों, " देवा, येवढ्या करितांच कां आमची मैत्री घडवून आणलीस ? "

× × × ×

—७—

दोन तीन दिवसानंतर एके दिवशीं दुपारीं कादंबिनीची मैत्रीण माझ्या घरीं आली. मला पाहतांच तिच्या डोळ्यांत आंसवें उभीं राहिलीं. आम्ही दोघेंहि आमच्या लाडक्या मैत्रिणीला आठवून शोक करूं लागलों. बराच वेळ आम्ही खेदमग्न स्थितींत होतों. नंतर माझ्या सखीची मैत्रीण म्हणाली, " आपण शोक करूं नये, असें कादंबिनीनें सांगितलें आहे. आपली आठवण तिला सारखी होत होती. पण

तो तरी काय करणार ? तिच्या वडिलांचा स्वभाव थोडासा तापट आहे. आपण आपलें स्वदेशसेवेचें व्रत अखंड चालू ठेवावें, अशी तिची आपणास विनंती आहे. ''

कांहीं वेळ आमच्यापैकीं कोणीं कांहीं बोललें नाहीं. पुनः ती म्हणाली, " आपण वाईट वाटून घेऊं नका. नाहीं तर ? ....काय सांगूं ? ....स्वर्गांत कादंबिनीला वाईट वाटेल. आलं ना लक्षांत ? "

मैत्रीण आपल्या घरीं चालती झाली. परंतु " स्वर्गांत कादंबिनीला वाईट वाटेल. " हे तिचे शब्द सारखे माझ्या कानांत घोळत होते. बराच वेळ मी कादंबिनीसंबंधानें विचार करीत होतों. मी जर कर्तव्यपराङ्मुख झालों तर कादंबिनीला स्वर्गांत वाईट वाटेल. यावरूनच तिचें देखील ध्येय मंगल स्वरूपाचें होतें, असं दिसतें. माझ्यापुढें लख्ख प्रकाश पडला. अगदीं दुरवर कोणी तरी मार्ग दाखवीत असावेसें वाटलें. कादंबिनीनें दिलेल्या केवड्याकडे मी बघूं लागलों. केवड्यांत पूर्वीची रंगीत जादू राहिली नव्हती. परंतु त्याचा सुवास अद्यापाहि कायम होता. कादंबिनी दृष्टीला दिसेनाशी झाली होती. परंतु माझ्या हृदयांत ती अधिक लडिवाळपणानें खेळत होती. माझ्या नसानसांतून वाहणाऱ्या रक्तांत कादंबिनी आपल्या चैतन्याचा ठेवा ठेवून गेली. कारण आकाशांतील तारका जरी निखळून जमिनीवर पडल्या तरी पृथ्वीवरील चांदण्या आमच्या सारख्यांच्या हृदयांत उडून बसतात. माझ्या लाडक्या चांदणीच्या प्रकाशांत सारें विश्व मला आनंदमय, प्रेममय, भक्तिमय दिसूं लागलें आहे. आणि त्या सत्स्फूर्तिदायक प्रकाशासमोर मीं आजन्म देशसेवा करण्याचा निश्चय केला आहे.

ता. १८-११-२६ बडोदें. वि. पां. दांडेकर.

कळी २ री

स्वार्थत्याग

" प्रभा, पुरें नाहीं कां झालीं आतां फुलं ? गौर दिसणार सुद्धां नाहीं इतकीं फुलं वाहिल्यानं ! "

" सगळीं फुलं वाहायचीं थोडींच आहेत ? कांहींच्या नुसत्या माळाच करून चौरंगावरून सोडणार आहें. पुन्हा उरलीं सुरलीं फुलं, हळदिकुंकवाला बायका येतील त्यांनां डोक्यांत घालायला द्यायला होतील; पण कमलावती, तूं येशील ना उद्यां मंगळागौरीला सजवायला ? तूं आलीस म्हणजे मला कित्ती आनंद होईल ! सकाळींच ये. मग बुधवारीं सकाळीं घरीं जा. आपण रात्रीं जागरण करूं, खूप मजा करूं, पण तूं आली नाहींस तर माझें मन कशांतच रमणार नाहीं. येशील ना मग कमल ? "

कमलावती आतां पावेतों प्रभावतीच्या प्रत्येक वाक्याला हुंकार देत होती. शेवटच्या प्रश्नाला सुद्धां तिनें हुंकार देण्याखेरीज कांहींच केलें नाहीं.

" कमलावती मी वाऱ्याशीं बोलतें असं कां तुला वाटतं ? मी काय प्रश्न केला तुला ? "

" प्रभा, तें बघ त्या पानाआड केवढं मोठ्ठं गुलाबाचं फूल लपून बसलं आहे. माझं लक्षच नव्हतं गेलं इतका वेळ. थांब हं....मी तोडतें. पण नको, तूंच तोड. फुलं तुला वाहायचीं आहेत. "

" तूं तोडीनास कां ! सहज गमतीनं तूं मंगळागौरीला फुलं वाह्य. "

" पाहिलं ! मी तुला म्हणत होतें, तूं कांहीं ऐकलं नाहींस. मी फूल तोडायला गेलें तों माझ्या बोटांत काटा रुतला आणि, फूल तोडून हातांत घेतलें तों त्याच्या पाकळ्या झाल्या. माझ्या नशिबांत मंगळागौरीचें पूजन कांहीं दिसत नाहीं. " कमलावती कांहींशा खिन्नतेनें आणि विनोदानें म्हणाली.

" मी ओळखला तुझा हेतू ! तूं उडवाउडवी करूं पहातेस ! कमलावती खरं सांग तूं येशीलना ? माझी ही पहिलीच मंगळागौर येथें होणार.

" होहो ! अग तुझ्या मंगळागौरीला मी हजर नसून कसं चालेल ? येईन, अगदीं अवश्य येईन. पण काग तुझी एकच मंगळागौर येथें होणार, आणि मग दुसऱ्या कुठं करणार ? "

कमलावतीला माहीत नव्हतें, असें नाहीं. पण थट्टा....न बोलतां प्रभावती बकुळीचीं फुलें वेचूं लागली. सासरचा प्रश्न निघाला म्हणजे मुग्धता स्वीकारणेंच तिला बरें वाटत असें. फुलें व पत्री त्या दोघींनीं मिळून एका टोपलींत भरलीं. बकुळीच्या माळा तेथेंच एका झाडाखालीं बसून कराव्यात अशी त्या दोघींची इच्छा होती; पण तितक्यांत संध्याकाळ होत आली, नव्हे झालीच. प्रभावतीला दुसरीही तयारी करावयाची होती म्हणून, तिला हा मोह आवरणें भागच होतें. " मोलकरणीला पाठवत्यें, तिच्या बरोबर टोपली पाठवून दे. " असें सांगून ती वरीं गेली.

प्रभावती व कमलावती या दोघी समवयस्क, चौदा वर्षांच्या, होत्या. पण प्रभेचें लग्न झालें होतें. तिची आजी फारच जुन्या मताची होती. प्रभेचें दहावें वर्ष संपतांच तिचें लग्न उरकून टाकण्याची टुरटुर म्हातारीनें आप्पांच्या-प्रभेच्या वडिलांच्या-मागें लाविली. 'पिकलें पान केव्हां गळून पडेल ' याचा नेम नव्हता म्हणून एकवेळ आप्पांनां वाटें, कीं आईचें मन मोडूं नये. पण प्रभेसारखी गोड, कोंवळी कळी, परक्याला देण्यालाही त्यांचें मन धजेना. परंतु शेवटीं मातृप्रेमानेंच विजय मिळविला. वैशाखांतच प्रभावती सौभाग्यवती झाली.

आज प्रभावतीच्या बालजीवाची कोण धांदल ! आज तिची पहिली वहिली मंगळागौर ! कां तिला आनन्द वाटणार नाहीं ? कितीही लहान, कितीही अशिक्षित, अरसिक मुलगी असो, पण लग्न होतांच एक प्रकारच्या नव चैतन्याचा तिच्या रोमरोमांत संचार होतो. प्रभावती शिकलेली नव्हती. नुकतीच कुठें तिनें चवथीची परिक्षा दिली होती. पण आज तिला विलक्षण उत्साह वाटत होता. त्यांतही कमलावती आज सकाळपासूनच रहावयास येणार; मग काय ! प्रभावतीला तो स्वर्गलाभच. कमलावतीच्या सहवासापेक्षां जगांत कांहीं अधिक रमणीय, मौल्यवान वस्तु असेल असें, तिचें बालमन तिला केव्हांच सांगत नसे. नऊ वाजले. अजून कमलावती आली नाहीं. प्रभावती अधीर झाली. पूजेची तयारी करतां करतां तिची नजर वारंवार दाराकडे वळूं लागली कमलावती विसरून तर गेली नसेल ? छे, ती विसरणार तर खास नाहीं. मग कां बरं ती अजून आली नाहीं ? प्रभेची स्थिरता प्रतिक्षणीं थोडथोडी लय पावूं लागली. क्रमाक्रमानें बारा वाजले. एक वाजला. जेवण्याची तयारी झाली. तरी कमलेचा

पत्ता नव्हता ! कमलावतीनें मला फसविलें ! तरीच काल तिनें इतकी उडवाउडवी केली. प्रभेचें लक्ष आतां इतर व्यवसायावरून पार उडालें. इतक्यांत बांगड्यांचा आवाज आला. आली कमल ! अहाहा ! प्रभेचें हृदय आनन्दानें नाचूं लागलें. घाईघाईनें ती बाहेर आली. पण ! ही तर गंगू मोलकरीण ! प्रभावती सज्ज्यांत आली व तिनें लांबवर नजर फेंकली. इतक्यांत तिच्या डोक्यांत एक कल्पना चमकली. हं असंच करावं ! मग पाहूं कशी येत नाहीं ! झटकन् ती स्वयंपाकघरांत शिरली. आजीच्या परवानगीनें तिनें गंगूला कमलेकडे पाठविलें.

गंगू परत आली. पण बरोबर कमलावती नव्हती. प्रभेनें अधीर-पणानें विचारलें. 'मी येणार नाहीं. वाट पाहूं नका' असा, कमला-वतीचा निरोप गंगूनें प्रभावतीला कळविला. दोनच अश्रुबिंदु तिच्या नेत्रांचा पाश तोडून नकळत पळून गेले. हंसत हंसत ती आंत आली. पण वाचकांनों, तिच्या हास्याला फसून जाऊं नका. लबाड पोर ! तिनें आपल्याला चकविलें. जणुं काय मुलींच वाईट वाटलें नाहीं, असा भाव दाखवीत लवकरच ती इतर मुलींत मिसळून गेली.

रात्रीचा दीड वाजला. खेळून खेळून दमल्यामुळें मुली नुकत्याच झोंपीं गेल्या होत्या. पण प्रभावती आपल्या एक एक मौल्यवान अश्रु-बिंदूची माला निद्रादेवीला अर्पण करण्यास गुंफीत होती. ' कमलावती आली नाहीं. माझ्या आग्रहपूर्वक आमंत्रणाचा तिनें स्वीकार केला नाहीं. बरं आहे ! मी पण आतां कधीं कधीं जाणार नाहीं तिच्याकडे ! '

दोन दिवस झाले. आजचा शुक्रवार ! रविवारीं प्रभावती सासरीं, पुण्यास जाणार होती. संध्याकाळीं कमलावती प्रभावतीस भेटण्यास आली.

" प्रभा, खरं सांग हं. हा माझा दोष कां ? आईनं सांगितलं नको जाऊं, मग कशी येऊं मी ? "

" कमलावती, आमच्याचकडे यायला मला वाटतं तुझी आई तुला नको म्हणते ! होय ना ? ठीक आहे ! पहातां येईल. "

" काय पहाणार आहेस ? " हंसत हंसत कमलावतीनें विचारलें.

" तुझी मंगळागौर होईल तेव्हां मी पण नाहीं येणार. "

" मंगळागौर पुजण्याचा प्रसंग माझ्यावर कधीं यायचाच नाहीं- "

" तो कसा ? "

" मी मुळीं लग्नच करणार नाहीं. "

" अंः बोलायच्या गोष्टी ह्या. "

" बरं ! तें जाऊं दे. तूं आतां येणार केव्हां ? "

" मला कसं सांगतां येईल ? "

" मग कुणाला ? मला सांगतां येईल ? हें बघ प्रभे, तूं ही लाज-बीज सगळी येथेंच ठेवून जा. नाहींतर तिथं गेल्यावर कुणीं माणूस पाणी बिणी मागायला आलं तर तूं बसशील अशी गुडघ्यांत मान घालून, नी मग जाईल सर्वच मुसळ केरांत ! "

" बरं बरं आजीबाई. पण कमलावती, मला कीं नाहीं काल-पासनं फारच वाईट वाटतं. "

" कशाचं ? "

" तूं आतां इंग्रजी शाळेंत जाणार. तूं पुष्कळ शिकशील मी मात्र आतां पाठीमागेंच रहाणार. मीं मुळींच शिकलें नसतें तर मला

वाईट वाटतें ना. पण मधाचें बोट एकदां चोखल्यावर तें अर्धवट सोडून देणें जिवावर येतें. ”

“ तूं तुझ्या सासऱ्याला सांग. लाजूं नकोस. त्यांनां सांग कीं मला शिकायचं आहे. ”

“ वेडी आहेस. असं कसं आपल्याला सांगतां येईल? बरं तें जाऊं दे. मधून मधून पत्र पाठवीत जा. तुला सुशिक्षित पाहून मला आनन्द होईल. माझा अर्धा आत्मा सुशिक्षित आहे एवढें समाधान मला पुरेसें आहे. ”

“ आतां मी नाहीं कांहीं तुझा अर्धा आत्मा. तुझा अर्धा प्राण सांपूं कुठें आहे ? पण प्रभे, आधीं तूं पत्र पाठवायचं हं ! ”

असाच आणखी थट्टाविनोद झाल्यावर कमलावती निघून गेली. प्रभावती रविवारीं सासरीं गेली. प्रभावतीचें सासरचें नांव सत्यवती होतें. त्याच नांवानें आतां तिला आपण संबोधूं. कमलावतीच्या म्हणण्या प्रमाणेंच झालें. नानासाहेब, सत्यवतीचे सासरे, सुधारक मताचे होते. आपल्या मुलाचें सोळाव्या वर्षी लग्न केलें. आतां सुनेला तरी शिक्षण द्यावें, असें त्यांना वाटत होतें. पण सून कबूल होईल कां ?

सकाळचा चहा झाल्यावर एक दिवस त्यांनीं सत्यवतीस बाहेर हांक मारली. सत्यवतीनें येऊन सासऱ्यास नमस्कार केला व ती उभी राहिली.

“ बैस बाळ त्या खुर्चीवर. लाजायला नको. मी तुला असं विचारतों कीं, आमची कुमुद, कुसुम शाळेंत जातात तेव्हां तुला आवड असेल तर तूंही जात जा त्यांच्या बरोबर. ”

' काय सांगावें, हें म्हणावें कीं नाहीं. ? ' कमलावतीची मूर्ति सत्यवतीच्या नेत्रांसमोर उभी ठाकली. तिचा निश्चय झाला.

" मग काय ? तूं शिकणार ना ? तुला वाटलं तर तूं येथें रहा, लाज वाटत असेल तर बडोद्यास जा. माझी कांहीं ना नाहीं. "

" होय. मी शिकेन. "

" शाबास ! बडोद्यासच ना ? "

" होय. "

" श्रावण संपला कीं मी तुला बडोद्यास पोंहचवून देईन. तेथें राहून शान्तपणें मनास येईल तितकें शीक. "

सत्यवतीस आनन्द झाला. नमस्कार करून ती आंत गेली. दोन डोळे दाराआडून सर्व प्रकार पाहात होते. आपल्या पत्नीला शिक्षणाची आवड आहे, असें पहातांच त्या नेत्रांत आनंदाश्रू चमकले. विभाकर नुकताच मॅट्रीक झाला होता. तो सोळा वर्षांचा होता. त्याच्या विचारांनां, भावनांनां नवी पालवी फुटूं लागली होती. वडिलांचा दाब असल्यामुळें, आपल्या लहानग्या पत्नीशीं बोलण्याचा त्याचा धीर होत नव्हता.

× × × ×

ठरल्या प्रमाणें सत्यवती माहेरीं येऊन, शाळेंत जाऊं लागली.

चार वर्षे हां हां म्हणतां निघून गेलीं. सत्यवती आतां बालिका नव्हती. मधून मधून ती सासरीं जात असे. आतांही दिवाळी निमित्त ती सासरींच आली होती. एके दिवशीं—गुरुवारच होता तो—रमाबाई, सत्यवतीच्या सासूबाई, दोन्ही मुलींना घेऊन बाहेर गेल्या होत्या.

नानासाहेबांनीं पत्ते झोडण्याकरितां, मित्राच्या घरचा रस्ता केव्हांच पकडला होता. घरांत फक्त विभाकर, सत्यवती व इतर नोकर माणसेंच होतीं.

तीन वाजले. विभाकरनें पुस्तकावरची नजर क्षणभर घड्याळाकडे फेंकिली. त्यानें पुस्तक मिटलें व डोळे चोळिले. त्याला पाणी हवें होतें. त्यानें नोकरांनां हांका मारल्या पण कुणीच ' ओ ' देईना. शेवटीं ' स्वतः मेल्याशिवाय स्वर्ग दिसेना, ' असें कांहींसें पुटपुटत तो खालीं आला. देवघरांत सत्यवती फुलांचा हार गुंफण्यांत मग्न झाली होती. स्वयंपाक घराकडे जातांना त्याची नजर देवघराकडे वळली. तो चपापला. पण दुसऱ्याच क्षणीं तो स्वयंपाक घराकडे गेला. पाणी पिऊन तो परत फिरला. पुन्हां तेंच ! आतां मात्र त्याचें मन त्याला आवरतां आलें नाहीं.

हिरव्या रंगाचें उंची लुगडें नेसून, सत्यवती माला गुंफीत होती. गोठ पाटल्यांनीं विभूषित झालेला तिचा गौरवर्ण हात, फुलें ओवतांना खालींवर होत असून, तो होतांना बांगड्यांचा मधुर आवाज होत होता. विभाकरला हें दृश्य सोडून जाववेना. पावलें न वाजवितां तो आंत गेला. कसें कुणांस ठाऊक पण सत्यवतीनें पावलें ओळखिलीं. ती उठून उभी राहिली. थंडीचे दिवस असतांही, तिच्या भालप्रदेशावर घर्मबिंदू चमकूं लागले. मुख अवनत झालें. लज्जेची वाढती कमान कानाच्या लालीवरून स्पष्ट दिसत होती. विभाकरला मौज वाटली.

" कुणाला हार गुंफणं चाललं होतं ? "

" देवाला. " खालीं पहातच सत्यवती उत्तरली.

Calcutta-27.

" देव भाग्यवान् म्हणायचे. पण हें काय ? हा अर्धवटच आहे. अर्धाच का हार देवाला वहाणार ? "

" नाहीं. "

" मग पुरा करा कीं. पहातों मी कसा करतां तें. आपल्यालाही शिकतां येईल. "

मुकाटयानें सुई घेऊन तिनें कांपऱ्या हातानें हार पुरा केला.

" आतां घाला कीं देवाला. मला पहायचं आहे देवाला हार कसा दिसतो तें. "

सत्यवतीस हंसू आलें. तिची भीडही आतां बरीचशी चेपली. ती देवाजवळ गेली, हार गळ्यांत घातला व देवाला नमस्कार केला.

" पहा इथें एक चालता बोलता देव उभा आहे. हार नाहीं तर नाहीं, निदान नमस्कार तरी ! "

पतीच्या विनोदीपणाचा हा तिचा पहिलाच अनुभव. ती खालीं वांकली—नव्हे वांकणार— ! पण आपण जाऊं या आतां.

विभाकर एम्. ए. झाला त्याच वर्षीं सत्यवती मॅट्रिकमध्यें गेली. मधून मधून त्यांचा पत्रव्यहार होत असे. मे महिन्याची सुट्टी होती. सत्यवती सध्यां पुण्यासच होती. पुष्कळ दिवसांनीं जवळ जवळ दोन वर्षांनीं ती सासरीं आली. सासरचें स्वरूप पालटलेलें दिसलें. सासू तिच्याशीं कधींच बोलत नसे. तिला सुनेचें शिक्षण पसन्त नव्हतें. नणंदांचीं तर लग्नें होऊन त्या सासरींच असत. बुधवारचा दिवस ! विभाकर संध्याकाळीं घरीं आला व 'जेवावयाचें नाहीं' असें सांगून स्वतःच्या खोलीकडे निघून गेला. सत्यवतीची सर्व कामें उरकलीं. दहा वाजले.

आज तिला उदास वाटत होतें. त्यांतच पति जेवला नाहीं हें पाहून तर तिची उदासीनता अधिकच वाढली. ती आपल्या बिछान्यावरून उठली व पाऊल न वाजवतां तिनें विभाकरची खोली गांठली. तिचें अंतःकरण कसल्या तरी बऱ्यावाईट शंकांनीं भरून गेलें होतें. तिनें दारावर हात ठेवला, तोंच तिचा उजवा डोळा लवला, ' चिन्ह कांहीं ठीक दिसत नाहीं, ' असें पुटपुटत तिनें दार तर ढकललें. खोलींत अंधुक, भयाण प्रकाश पसरला होता. त्या प्रकाशांतच तिनें विभाकरला पाहिलें. तो निद्रिस्त होता. पलंगाजवळ जाऊन ती उभी राहिली. चाहूल लागतांच विभाकरनें डोळे उघडले, तेव्हां सत्यवती त्याच्या दृष्टीस पडली. तिच्याकडे पाहून तो हंसला, खिन्नपणें हंसला. सत्यवती चरकली.

" सत्यवती, थोडें पाणी दे पाहूं "

तिनें पाणी दिलें, व अंगाला हात लावला. विभाकरचें अंग तापलें होतें.

" ताप कां आला आहे ? "

" हो, जरा बरं वाटत नाहीं; पण काळजीचें कारण नाहीं. तूं नीज जा. "

" मीं बसत्यें थोडा वेळ इथंच. थर्मामिटर लावून पाहूं कां ? "

" कारण दिसत नाहीं. पण तुझी इच्छाच असेल तर लाव. "

तिनें थर्मामिटर लावलें. ताप कांहीं फारसा नव्हता. पण तेव-ढ्यानेंच सत्यवतीची अस्वस्थता बेसुमार वाढली.

ती सबंध रात्र तिनें विभाकरच्या पायाशीं बसून काढली. "देवा,

तुझ्या राज्यांत माणसांची लूट पडली असेल तर—तर मला ने. पण—! " तिनें विभाकरकडे पाहिलें. त्याला गाढ झोंप लागली होती. " देवा ! माझ्या आशेची ज्योत मालवूं नकोस. "

पहांट झाली. सत्यवतीनें पुन्हां एकदां हात लावून पाहिला. रात्रीपेक्षां तिला उष्णता अधिक भासली. जागरणानें तिचे डोळे लाल झाले होते. चिन्तेनें खिन्नतेचा काळीमा मुखावर पसरला होता. तिचें कामाकडे लक्ष लागेना.

" बाळ, तुला बरं का वाटत नाहीं ? " नानासाहेबांनीं विचारलें.

" मला तर बरं वाटतं. पण—"

" पण काय ? "

" बरं वाटत नाहीं. रात्रीं ताप—" लज्जेनें तिच्यानें पुढें बोलवेना.

" विभाकरविषयीं कां तूं म्हणतेस ? "

" हो. "

घाईघाईनें नानासाहेब विभाकरच्या खोलींत गेले. खरंच ! विभाकर आतां सपाटून तापला होता. म्हाताऱ्याची तर कंबरच खचली. एकुलता एक पुत्र. आतांच कुठें हाता तोंडाशीं आलेला. त्याला ताप आलेला पाहून, त्यांचें मस्तक भ्रमूं लागलें. डॉक्टर आले. ' नऊ दिवस जपलें पाहिजे, ' असें सांगून ते निघून गेले.

सत्यवतीनें शिकस्त केली. जिवाची बेपर्वा करून तिनें विभाकरची शुश्रूषा केली. पण—! चवथ्या दिवशीं विभाकरची प्रकृति बेताल झाली. सर्वांचाच धीर सुटला. अखेर सत्यवतीची भीतिच खरी ठरली. त्या दिवशीं संध्याकाळीं सत्यवतीचा सौभाग्यरवि अस्तंगत झाला.

बिचारी सत्यवती ! नुकताच तिनें खेळायला आरंभ केला होता. पण—! सुरवातीलाच संसाराच्या सारीपाटाचा संवगडी खेळ सोडून देऊन चालता झाला. तिचें मधुर स्वप्न भंग पावलें. तिच्या आशा आकांक्षा जळून गेल्या, बेचिराख झाल्या. निराशेची राख मात्र भूत-काळचें स्मरण देण्यास सत्यवतीच्या हातांत राहिली. तिला तो गुरुवार आठवला. किती मधुर स्मृति ! पण दैवानें पाठ फिरविल्यामुळें त्या मधुर स्मृतीनेंच अंतःकरण दुप्पट विदीर्ण केलें. ती जिवाला कंटाळली. तिनें आपल्या भावी आयूष्यावर नजर टाकली. जिकडे तिकडे अंधः—कारच आपलें भयाण स्वरूप प्रगट करीत होता. बाहेर प्रकाश होता; पण सत्यवतीच्या अंतःकरणांतील दीप मालवला असतां, तेथें तेजः—किरणाचा रिघाव कुठून होणार ?

जवळ जवळ दहाबारा दिवस सत्यवतीस झोंप आली नाहीं. आज मात्र तिचें शान्त मन ऐकेना. दुपारीं विभाकरचा विचार करतां करतां तिला झोंप आली.

" सत्यवती, तूं शिक्षण सोडूं नकोस. आयुष्याचें कांहींतरी ध्येय ठरीव व तें मिळविण्याचा प्रयत्न कर. ईश्वरावर विश्वास ठेव, म्हणजे तोच तुला सहाय होईल; व तूं सुखी होशील. देव करतो तें बऱ्याच-करितां करतो अशी मनाची भावना ठेव. नन्तर—नन्तर सत्यवती, मी तुझी वाट पहात आहें. "

सत्यवती जागी झाली. खरंच का हे विभाकरचे शब्द ! पण स्वर्गासारखें स्थान सोडून ते कशाला पुन्हां या मर्त्य जगांत येतील ? मग काय स्वप्नच सारं ! विभाकरचे शब्द सत्यवती आठवूं लागली. " देवावर मी विश्वास ठेवीन ", माझा विश्वास आहे. पण माझें

सौख्यनिधान मज जवळून हरवल्यावर मला सौख्यलाभ कुठून कसा होणार ? आपला अवमान मी करीत नाहीं; पण पतिविहीन जीवनांत कोणत्या स्त्रीला सौख्याच्या ओलावा आढळेल ! देव सर्व बऱ्याकरितां करतो ! माझ्या नव भावनांचे अंकुर समूळ उपटून टाकण्यांत देवानें माझें काय हित पाहिलें असेल ? माझ्या आशा आकांक्षांचा नाश करून देवानें मज करतां कोणत्या सौख्याची संपादणी करून ठेवली असेल ? आपल्या प्रेमपूर्ण साह्याय्याभावीं देवाच्या नीरस साह्याय्याची मी अपेक्षा करूं ? कां बरं ही अवहेलना ! " सत्यवतीची उशी अश्रूंनीं भिजून गेली. हृदयाची व्याकुळता प्रतिक्षणीं वृद्धिंगत होत होती.

× × × ×

वरील गोष्टीला दीड वर्ष लोटलें. चला वाचकांनों, आतां कमलावतीची भेट घेऊं या. आठ वर्षें झालीं तिच्या आपल्या प्रथम भेटीला. त्या वेळीं ती परकर पोलका घालून सत्यवती बरोबर फुलें तोडीत होती. आतां ती बालिका नव्हती.

पण ही कोण ? हातावर गाल टेंकून खिडकीजवळ बसलेली तरुणी कोण ? कमलावतीकडे कोणी पाहुणी तर नाहींना आली ? तें पहा तिनें तोंड फिरविलें. अरेच्या ! ही तर आपली पूर्वपरिचित कमलावतीच ! पण ती रडत कां आहे ?

विभाकरच्या मृत्यूची बातमी ऐकून कमलावतीस अतिशय वाईट वाटलें. सत्यवतीच्या भावना तिला अपरिचित नव्हत्या. असलें भावनामय हृदय, असल्या भयंकर निष्ठुर रीतीनें चुरगळलेलें पहातांच तिचें मस्तक बधिर झालें. सत्यवतीचें सांत्वन कसें करावें ? ' तिचें कोण सांत्वन करील ? माझी कोमल कलिका कोमेजली असेल. '

कमलावतीला सत्यवतींच्या सासूचें सत्यवतीशीं कसें वर्तन होतें, हें माहित होतें. अशा प्रसंगीं फक्त नानासाहेबांचाच तिला धीर वाटत होता. पण दैवाला तेंही साहवलें नाहीं. विभाकरनन्तर एकच वर्षानें म्हातारा पुत्रास भेटण्यास निघून गेला. सत्यवतीचा आधार तुटला. सासऱ्याच्या मृत्यूनंतर अवघ्या अडीच महिन्यांत माहेरीं तिची कायमची रवानगी झाली.

कमलावती या सुमारास इंटरमध्यें होती. तिचे आईबाप सुशिक्षित, सुधारक होते. कमलावतीची इच्छा होईल, तेव्हां तिला पसन्त असलेल्या वराबरोबर तिचा विवाह होण्याचें ठरलें होतें. प्रभाकर नांवाच्या एका सुशिक्षित तरुणाला कमलावती आपली वरमाला अर्पण करणार होती. ही गोष्ट सत्यवतीला चारपांच वर्षांपूर्वी पासूनच माहीत होती.

विभाकरच्या मृत्यूनन्तर सत्यवतीमध्यें अतिशयच फरक पडला. ती सध्यां प्रीव्हियसमध्यें होती. कमलावतीला सत्यवतीविषयीं अतिशयच वाईट वाटे. तिची वैराग्यवृत्ति पाहून कमलेलाही संसारांत पडूं नयेसें वाटें. पण मग प्रभाकर ? प्रभाकरची निराशा करण्याचा तिला धीर होईना. आज नाहीं उद्यां सत्यवतीची वृत्ति पालटेल असें तिला वाटे. सत्यवती ' मेडिकल कोर्स ' घेणार होती. सासरची अर्धी अधिक संपत्ति तिचीच होती. तिच्या मदतीनें ती एक दवाखाना उघडणार होती. कमलावती बी. ए. होऊन संसारांत पडणार होती.

एके दिवशीं उभयतां मैत्रिणी गोष्टी बोलत असतां कमलावतीनें सहज गोष्ट काढली. तिनें विचारलें, " सत्यवती किती दिवस हूं असे दुःखांत काढणार ? लक्षांत ठेव प्रभे, तुझ्यावर माझी सर्व वृत्ति अवलंबून आहे. तुला खिन्न पाहिलें कीं माझ्या सर्व प्रफुल्लित वृत्तींचा

लोप होतो. "

" आणि कमल, तुझ्याकरितां, निव्वळ तुझ्याचकरितां, मी सर्व गोष्टींचा विसर पाडूं पहातें. पण काय करूं ? मी कुठवर सहन करावं ? लहानपणापासून मातृसुख म्हणजे काय चीज आहे ती मला माहित नाहीं. आजी होती तोंपर्यन्त माझी स्थिति चांगली होती. सुदैवानं सासरीं सर्व सुखं अनुकूल होतीं पण तेंही दैवाला साहविलं नाहीं. प्रेमाची आंच लागते न लागते तोंच दुर्दैवानें चांगलाच हात दाखविला. प्रेमानं हांक मारणारं सुद्धां तुझ्यावांचून मला काणी नाहीं. कमलावती, तूं आहेस तोंपर्यन्त मी सर्व विसरेन. पण तूं गेलीस तर मी प्रेमविहीन आयुष्य कोणत्या आधारावर कंठूं ? " सत्यवतीला पुढें बोलेवना.

" सत्यवती, तूं घाबरूं नकोस मी केव्हांही तुला सोडणार नाहीं. आपण प्रवासाला आरंभ एकत्र केला शेवटहि आपण एकत्रच करूं. आनन्दानें एकमेकांच्या हातांत हात घालून हा कंटकमय मार्ग आपण पार पाडूं. मग जग जरी आपल्यावर उलटलें तरी त्याची आपण पर्वा करणार नाहीं. "

" नको कमल, माझ्याकरतां प्रभाकरांना अन्तर देऊं नकोस. त्यांचे मनोरथ, मनाच्या पहिल्या आवेगासरशीं, निष्फल करूं नकोस. माझें ध्येय तर मी ठरविलेंच आहे. तें मी तुम्हां सर्वांच्या आशीर्वादानें पार पाडीन, तुला संसार करतांना पाहिलें म्हणजे मला खरोखरीच आनन्द होईल. "

" सत्यवती, मी केव्हांचाच पूर्ण विचार करून ठेविला आहे. प्रभा-

कर श्रीमन्त आहेत, सुशिक्षित आहेत, पुन्हां सुस्वरूपही आहेत, कुणीही त्यांनां आत्मसमर्पण करील. त्यांनां माझी आवश्यकताच आहे असें नाहीं. जें सुख तुला लाभलें नाहीं त्या सुखाची मी तरी कां अपेक्षा करावी? तुझ्या सुखांतच माझें सुख. सत्यवती, मी तुझा अर्धा आत्मा ना? तूं दुःखांत असतां तुझ्या अर्ध्या आत्म्याला सुखाची सांवली कशी सहन करवेल?"

"कमल, शपथ आहे"

"मी तुझें ऐकणार नाहीं. माझ्या आड तूं येऊं नकोस."

× × × × ×

आज प्रभाकरची गडबड उडाली होती. सर्वांच्या भेटी त्यानें घेतल्या. फक्त कमलावतीची भेट घेण्याचें राहिलें होतें. आठ दिवसांनीं, इंग्लंडला जाण्यास, तो बोटींत बसणार होता. दोन महिने झाले होते कमलावतीची भेट घेतल्याला. दोन महिन्यांत कमलावतीमध्यें कसें व काय स्थित्यंतर झालें होतें याची प्रभाकरला यत्किंचितही जाणीव नव्हती, तो आपल्याच आनन्दात गर्क होता. अण्णासाहेबांनीं, कमलावतीच्या वडिलांनीं, प्रभाकरला आज जेवण्याचें आमंत्रण दिलें होतें. समारंभ तर सुखरूपपणें पार पडला; पण कमलावतीचा कुठें पत्ता होता! प्रभाकरचे डोळे वारंवार दरवाज्याकडे वळत. प्रभाकरची स्थिति अण्णासाहेबांच्या लक्षांत येण्यास फार वेळ लागला नाहीं. त्यांनीं कमलावतीस हांक मारली. अत्यंत गंभीरपणानें तिनें दिवाणखान्यांत प्रवेश केला. आजचा प्रकार प्रभाकरला कांहीं वेगळाच भासला. वेगळाच होता तो! कमलावतीच्या नेत्रांत निश्चयाचें, गांभीर्याचें पाणी

चमकत होतें. तिच्या आवाजांतही एक प्रकारचा कठोरपणा भासत होता. अण्णासाहेब कामाच्या निमित्तानें बाहेर गेले. बराच वेळ तेथें शांतीचें साम्राज्य पसरलें होतें. कमलावती बाह्यतः शांत व निश्चयी दिसत होती. बाकी अंतर्यामींची खळबळ तिची तिलाच माहीत !

प्रभाकरला पहातांक्षणींच तिचा निश्चय ढासळूं पहात होता. एकवार—फक्त एकचवार तोंडांतून नकार बाहेर पडला कीं जिंकलें असें तिला वाटत होतें, पण एवढी निर्दयता तिनें संपादन केली नव्हती. प्रभाकरकडे तिचें अंतःकरण नैसर्गिक शुद्ध भावानें ओढ घेत होतें. आजपर्यन्त पत्नीभावानें ज्याच्याकडे दृष्टी फेंकिली, ज्याच्याशीं पत्नी-भावानें आज चारपांच वर्षें आचरण ठेविलें, त्यालाच ऐनवेळीं नकार देणें कोणत्या स्त्रीला शक्य होईल ? आपल्या मनींमुखीं उभे रहाण्याची तिनें देवाला प्रार्थना केली.

" कमल परवां मी मुंबईस जाणार ! "

" हूं ! "

" मी इंग्लंडला जाणार हें तुला माहीत होतें. माझ्या आशेची इतक्या लवकर सफलता होईल असें मला वाटत नव्हतें. कमल, वारंवार पत्र पाठवशील ना ? "

कमलावतीनें एकदांच ओंठ चावले. दुसऱ्याचक्षणीं ती उद्गारली, " नाहीं. "

" कां ? "

" आपल्याशीं मला यापुढें संबंध ठेवतां येणार नाहीं. "

" कां ? माझ्या हातून असें काय झालें कीं तुला माझा इतका

तिरस्कार वाटावा ? "

" त्याला कांहीं कारण नाहीं पण संसारांत पडण्याची माझी इच्छा नाहीं. माझं ध्येय बेगळं ठरलं, माझं कर्तव्यही वेगळं झालं. तें मला बजावलं पाहिजे. "

" कारणावांचून वचनभंग करणें, एकाद्याचा प्रेमभंग करणें हें तुझें कर्तव्य ? आजपर्यन्त स्वहस्तानें वाढविलेल्या आशांकुरांचा नाश करणें हें तुझें ध्येय ? कर्तव्याच्या नांवाखालीं वाग्निश्चित पतीला दूर सारून तूं दुसऱ्याबरोबर लग्न करूं इच्छितेस ? तूं इतकी चंचल होतीस—आहेस ? "

" नाहीं. मी चंचल नाहीं. तुम्हांला दिलेला हक्क तुमच्या जवळून काढून घेऊन तो दुसऱ्याला अर्पण करण्याइतकी मी चंचल, निष्ठुर नाहीं. मी आजन्म अविवाहित राहीन. परोपकारांत आयुष्य वेचण्याचें व्रत मीं स्वीकारलें आहे. आपण आशीर्वाद द्यावा म्हणजे माझ्या हांतून चांगलें व्रत पालन होईल. या पलीकडे मी आपणापासून कशाचेच अपेक्षा करीत नाहीं. "

" कमलावती, विचार कर. माझ्या हृदयावर केवढा जबरदस्त आघात करीत आहेस त्याचा विचार कर. मनाचा मोह मावळल्यानंतर तुला आपल्या कृतीचा पश्चाताप होईल. "

" मी विचार केला आहे. तुम्ही श्रीमन्त, सुशिक्षित, सुस्वरूप आहांत. कुणीही आर्यकन्या अभिमानानें तुम्हांला आपली वरमाला अर्पण करील. तिच्या सहवासांत सुखी व्हा. बालपणापासून कुणी-

तरी आपली एक सहचरी होती हें विसरून जा. आपल्याला देव सुखी ठेवील."

" आतां माझ्या सुखाची काळजी तुला कां? माझ्या सौख्याचा तारा तूं आपल्या हातानें दृष्टीआड केलास; निराशेचें धुकें माझ्या भावी आयुष्यपथावर पसरून ठेविलेंस- कमलावती, तूं इतकी निष्ठुर आहेस?"

कमलावतीचा निश्चय ढळूं लागला. पण सत्यवतीची तिलक-विहीन करुणमूर्ति तिच्या मनःचक्षूंसमोर येऊन उभी राहिली. " होय मी निष्ठुर आहें. पाषाणापेक्षांही मी अधिक निष्ठुर आहें. आपल्या प्रेमळ, रसिक हृदयाला माझ्या नीरस हृदयाची जोड शोभणार नाहीं. आपला मार्ग मीं मोकळा केला आहे. तुम्हीं विवाह केलांत तर कुणी तुम्हांला दोष लावूं शकणार नाहीं तुम्हीं सुखी व्हा. माझ्या सौख्याचा तारा मला सांपडला. मी तुमच्याशीं बेइमान होणार नाहीं. येत्यें आतां मी."

" किती उत्साहानें मी तुझा निरोप घेण्यास आलों; पण कमलावती, तूं निष्ठुर निष्प्रेम शब्दांनीं, खिन्न, निराश भावनांची देणगी देऊन माझी बोळवण करीत आहेस. ह्या जन्मीं नाहींतर नाही पण पुढल्या जन्मीं तरी तुझ्या सहवासाची मीं देवाजवळ प्रार्थना करीन. आणि—जरा थांब—कमल, अण्णासाहेबांना हें पसन्त आहे?"

" लग्न ठरवतांना कुठें मीं त्यांची संमति घेतली होती तर आतां घ्यावी. आणि—तुम्ही काय त्यांनां ओळखत नाहीं?"

इतकेंच बोलून कमलावती जड अंतःकरणानें आंत गेली. एक प्रकारचें ओझें दूर सारल्याप्रमाणें तिला वाटलें; पण आतांपर्यन्त ओढून ताणून आणलेली निष्ठुरता नाहींशी झाली. प्रभाकरची मूर्ति

तिच्या नजरेसमोरून जाईना. ती खिडकी जवळ गेली. त्याचवेळीं प्रभाकर जातांना तिला दिसला. तिच्या डोळ्यांत अश्रू चमकले. प्रभाकरनें तिच्याकडे पाहिलें. चार नेत्रांचें मीलन झालें पण चारही अश्रूंनीं भरले होते. आतां मात्र कमलावतीच्यानें रहावेना. पलंगावर अंग टाकून तिनें आपलें हृदय मोकळें केलें.

× × × × ×

प्रभाकर इंग्लंडला गेल्याला पांच वर्षे झालीं. या अवधींत त्याच्या कडून एकही पत्र हिंदुस्थानांत आलें नाहीं. तो येथें येणार नाहीं अशी सर्वत्र बोलवा होती. कुणी म्हणत त्यानें एका लेडीशीं लग्न लाविलें असून तिच्यासह तो तेथेंच रहाणार आहे. कुणी कांहीं, कुणी कांहीं, तर्क वितर्क काढांत असत. खरें कारण मात्र सत्यवती व कमलावती या दोघींनाच माहित होतें.

सत्यवतीच्या आश्रमाशेजारींच कमलावतीनें गरिबांच्या मुलीं-करतां मोफत–विद्यालय काढलें होतें. सत्यवतीलाही ती तिच्या कामांत कारणपरत्वें मदत करी. एक दिवस कमलावती सत्यवतीच्या आश्र-मांतील आपल्या खोलींत ‘ टाइम्स ’ वाचीत पडली होती. इतक्यांत तिची नजर एका फोटोवर गेली. ती चमकली. तो फोटो प्रभाकरचा होता. तिनें खालीं छापलेला मजकूर वाचिला. इंग्लंडांत एका सायन्स-लेबॉरेटरीमध्यें काम करीत असतां त्यानें एका किरणाचा शोध लाविला होता. त्याबद्दल त्याचा सर्वत्र गौरव करण्यांत आला होता. कमलावतीनें हा मजकुर वाचतांक्षणींच तिचे नेत्र आनंदाश्रूंनीं भरून आले. तिनें मनःपूर्वक देवाची प्रार्थना केली, “देवा, कुठेंही प्रभाकरांना सुखी ठेव.”

कु. ईंदुमति आर्ते.

कळी ३ री.

समुद्रफूल

पूर्वी हिमालयावर सारंग आणि त्रिवेणी या नांवाचें एक धार्मिक दांपत्य रहात असे. हें जोडपें जरी सर्वथैव सुखी होतें तरी त्यांना संतती नसल्यामुळें, त्यांच्या मनास शांति मिळेनाशी झाली. आणि पुढें पुढें ही चिंता द्विगुणित झाली. पुत्रसंतान नसलें तर पितृऋण फिटत नाहीं हा एकच विचार रात्रंदिवस त्या द्वयींच्या मनःचक्षूंपुढें उभा राहूं लागला. व आतां त्यांना काय करावें हें सुचेनासें झालें. शेवटीं त्रिवेणीच्या सुपीक डोक्यांत एक युक्ति आली. ती म्हणाली कीं, तो जगद्दुःखनिवारक चक्रवर्ति भोलानाथ आपल्याला कधींही निराश करणार नाहीं. तर एकादे शिवलिंग पाहून तेथें थोडें दिवस तपश्चर्या करावी. हा विचार सारंगाला पटला व तो ह्याप्रमाणें त्यांच्या झोंपडीच्या जवळ एका उंच टेकडीवर असलेल्या स्वयंभु शिवलिंगापुढें आराधना करीत बसला. त्रिवेणीही त्या लिंगाची व आपल्या पतीची नित्य पूजा करून येत असे. हें शिवलिंग एकांत स्थळीं असल्यामुळें त्या ठिकाणीं वन्य पशुपक्ष्यांशिवाय कोणीही येत नसे. मात्र दरवर्षी महाशिवरात्रीच्या दिवशीं रुद्राधर नांवाचा एक ब्राह्मण त्या लिंगाच्या दर्शनाश येत असे; असो.

तो नित्याप्रमाणें त्याही वेळेस तेथें यावयास निघाला असतां त्या दिवशीं बर्फ पडल्यामुळें आपणांस वाट मिळणार नाहीं असा विचार

करून बरोबर कुऱ्हाड घेऊन वाट करीत करीत तो त्या टेकडीवर येऊन पोहोंचला. शिवलिंग बर्फांत अदृश्य झालेलें त्याला आढळून आलें, म्हणून त्यानें आजूबाजूचें बर्फ छाटण्यास आरंभ केला. तेव्हां शिवलिंगापुढें ध्यानस्थ बसलेल्या सारंगाला रुद्राधराची कुऱ्हाड लागली व आधींच कृश झालेल्या त्याच्या शरीरास तो आघात असह्य होऊन त्यानें शिव शिव म्हणत त्या शिवपिंडीपुढें आपले पंचप्राण सोडले.

अशी सारंगाची स्थिति पाहून रुद्राधराला पराकाष्ठेचें दुःख झालें व तो आपल्या अघोर कृत्याबद्दल त्या दयाघन शिवाची क्षमा मागूं लागला. अनुतप्त अंतःकरणानें क्षमा मागीत असतां तो एकाएकीं मूर्छा येऊन पडला. त्याबरोबर त्याची मानवाकृती प्रचंड हिमशीला झाली. ही शीला रुद्रशीला या नांवानें प्रसिद्ध आहे.

इतक्यांत पूजासाहित्य घेऊन त्रिवेणी तेथें आली. तिला हा सर्व प्रकार पाहून आश्चर्य, खेद व दुःख वाटूं लागलें. संतानप्राप्ती-शिवाय आपला पति मृत्यूमुखीं पडला हें पाहून तिला फारच वाईट वाटलें. परंतु महाशिवरात्री सारख्या पवित्र दिवशीं आपल्या पतीस मृत्यु आला त्या अर्थी तो मोठा पुण्यवान् असला पाहिजे अशी तिची खात्री झाली.

नंतर तिनें पतिसह आपणांस शिवचरणीं ठाव मिळावा म्हणून त्याची (शिवाची) मनोभावानें करुणा भाकली. आधींच भोळ्या मनाच्या शंभूला ही त्रिवेणीची करुणाजनक प्रार्थना ऐकून जास्तच द्रव आला. व त्यानें आपल्या दैवी शक्तीच्या योगानें सारंगाचा वृक्ष व त्रिवेणीची त्या वृक्षाजवळून वाहाणारी नदी निर्माण करून आपल्या

पार्श्वभागीं स्थापन केली. ह्या सारंगवृक्षाला दररोज एक हिमधवल पुष्प येत असून सूर्योदय होताक्षणींच तें शिवलिंगावर पडतें. नंतर तें त्रिवेणीच्या ओघानें वहात जाऊन समुद्रास मिळतें.

कधीं कधीं हें पुष्प समुद्रकिनाऱ्यावर सांपडतें. ह्याच सारंग पुष्पाला आपण समुद्रफूल म्हणतों.

कु. कृष्णाबाई वेदक.

कळी ४ थी

चांदणी

चार पांच वर्षांपूर्वींची गोष्ट; संध्याकाळची सात वाजण्याची वेळ. भगवान् अंशुमालींच्या गमनामुळें खिन्न झालेली संध्या अजूनही पश्चिम-महालीं विषण्णपणें उभी होती. तिला हिणविण्याकरितांच कीं काय कोण जाणे, बऱ्याचशा तारका आकाशाच्या गवाक्षांतून तिजकडे डोकावून पहात व गालांतल्या गालांत हंसून पळून जात. त्यांचा त्रास चुकविण्यासाठीं संध्येनेंही महालाचें द्वार बंद करून घेतलें. ह्याच वेळीं दोन बालिका, एका बंगल्याच्या सभोंवतीं असलेल्या बागेंत हातांत हात घालून फिरत होत्या. मीही बंगल्या भोंवतालच्या आपल्या छोटेखानी बागेंत फिरून स्वतःची करमणूक करीत होतों. मला फिरतांना पाहून एका बालिकेनें—ललितकलेनें—मला हांक मारिली.

" तारानाथ, आज एकटाचसा फिरतोस ? अशोक कुठें आहे ? "

" गेला आहे दादांच्याबरोबर फिरायला. "

" मग आपली स्वारी कशी राहिली घरीं ? " शशिकलेनें—ललितेच्या धाकट्या बहिणीनें पृच्छा केली.

" आपण आपली नावडती मंडळी, आपल्याला कोण नेणार ? "

ह्याप्रमाणें बराच वेळ आमचा थट्टा विनोद चालू होता. आम्ही तिघेंही सारखींच. मी त्यावेळीं पंधरा सोळा वर्षांचा असेन. ललित.

कला माझीच जोडीदारीण. शशिकला आमच्याहून दोन तीन वर्षांनीं लहान. आमच्यामध्यें गप्पांनां विषय तरी कसला निघणार ? आज आई अमक्या कारणानें रागें भरली, मास्तरची आज अशी मजा केली; अशाच तऱ्हेच्या गप्पासप्पांत आमचा वेळ गेला. रात्र सुद्धां झाली; पण चांदण्यांचा प्रकाश स्वच्छ पडल्यामुळें व आमचे बंगलेही शेजारींच असल्यामुळें घरीं जाण्याची मला विशेष घाई नव्हती. वास्तविक पहातां बोलण्याचा मक्ता नेहमीं आम्हांकडेच—मी व ललितकला—सोंपविलेला असे. शशी त्यामध्यें क्वचित्च भाग घेई. अशोकचें व तिचें चांगले पटे. इतकेंच काय पण आम्ही सर्वजण त्या दोघांची भावी वधूवर म्हणून थट्टाही करीत असूं. शशीकडे तुम्ही केव्हांही बघा ती दुर्मुखलेली नसायचीच. तिचा चेहरा स्वभावतःच गोड व प्रफुल्लित असे. पण आमची ललित म्हणजे केवळ गांभीर्याची पुतळीच ! निकटच्या परिचयाच्या माणसांखेरीज इतरांशीं ती क्वचित्च बोले. पण दोघीही बहिणी स्वभावानें अगदीं शांत व मनमिळाऊ. शशिकला सर्वांनाच प्रिय होती. मलाही पण ती आवडत असे. पण कां कुणास ठाऊक, ललितवर माझें अधिक प्रेम असे. ' समानशीलव्यसनेषु सख्यम् ' म्हणतात ना तसेंच असेल कदाचित्. ललितवर तिच्या मातेचें विशेषसें प्रेम नव्हतें. मी तरी माझ्या आईचा नावडताच होतों. अशोकवरच तिचें अधिक प्रेम असे. दुसरी गोष्ट म्हणजे आम्हीं चौघेही काकासाहेबांकडे शिकत असूं. त्यावेळीं संस्कृतमध्यें ललितचीच मला अधिक मदत होई. अस्तु.

आम्हांला आतां कंटाळा आला. मोठ्या माणसांसारखे बसून गप्पा तरी किती करणार ? खेळावयास मीच अधिक उत्सुक होतों.

" ललित, आपण लपंडाव खेळूं या. "

" तिघांमध्येंच काय खेळायचं ? " शशी म्हणाली.

" अशोकशिवाय खेळांत मन रमत नाहीं असं स्पष्टच का म्हणेनास. "

" तसं नव्हे रे तारानाथ—आणि शिवाय असं पहा, लपंडाव खेळलों तर डोळे झांकावयास नको का कुणीं ? "

" ही तर एक अडचण आहेच; पण दुसरी गोष्ट म्हणजे आतां झाली आहे रात्र. झाडांझुडपांत लपलों तर आई रागावेल कदाचित्. त्यापेक्षां आपण भेंड्या लावूं या. " ललित म्हणाली.

भेंड्या खेळणें हा ललितकलेचा अगदीं प्रिय खेळ. ती स्वतः त्यामध्यें अत्यन्त प्रवीण होती. आणि—" पुष्पासंगें मातीस वास लागे—" या न्यायानुसार मलाही अलीकडे कवितांचें बरेंचसें ज्ञान झालेलें होतें.

" सुरवात तूं कर तारानाथ. "

" मी कशाला ? कल्पना काढली, त्यांनींच करावी. "

" हें काय तारानाथ ? तूं सुद्धां माझें ऐकत नाहींस. "

" सांभाळ तारानाथ, आमच्या ताईचा राग आहे तो ! मी म्हणूं कां ताई ? मी करत्यें हं सुरवात, " ताईला समजाविण्याचा प्रयत्न करीत शशिकला म्हणाली.

इतक्यांत अशोकही आलाच. मग झालेंच. मी व ललित आणि अशोक व शशिकला असे तट पाडून आम्हीं खेळावयास सुरवात केली. पुष्कळ वेळ, जवळ जवळ नऊ वाजेपर्यंत आम्ही खेळत होतों.

नंतर जेवावयास हांक मारल्यामुळें मी व अशोक घरीं गेलों.

× × × ×

परस्परांच्या संगतींत आम्हीं या प्रमाणें सुखानें कालक्रमणा केली. पण एकाच व्यक्तीनें किंवा एकाच कुटुंबानें सदैव आनंदी असणें हें दैवाला आवडत नसतें. पूर्वजन्मींच्या ऋणानुबंधाची गांठ आतां तुटून पडणार आहे अशी कल्पना स्वप्नांत सुद्धां येत नाहीं. ऐहिक सौख्यांत मग्न होऊन, आनंदानें बेहोष झालेल्या मानवी दृष्टीला भीषण भवितव्यता कशी दिसणार ? पण ती दिसत नाहीं, हेंच केवढें भाग्य ! काल व आपण यामध्यें भवितव्यतेचा पडदा आहे म्हणून बरें ! नाहींतर " सुख पहातां जवा पाडें, दुःख पर्वता एवढें " अशी स्थिति असतांना पुढें येणाऱ्या संकटांचा बागुलबोवा मनांत बाळगून आज हातच्या सौख्याला, आनंदाला मनुष्यप्राणी आंचवला असता. ईश्वरानें केलेल्या योजनेंत चूक कोठून असणार ? आपल्या कोत्या बुद्धीला मात्र ईश्वराचा थोरपणा कळत नसल्यामुळें आपण त्याला नांवें ठेवतों, इतकेंच.

× × × ×

सोमवार होता तो ! मी, अशोक, ललितकला व शशिकला, आम्ही चौघे जण गच्चीवर बसलों होतों. सर्व नभोमंडळ कौमुदीच्या धवल प्रकाशानें तेजोमय झालें होतें. गच्चींत आम्हीं खेळत होतों. आकाशांत चंद्रांनें आपल्या परिवारासह लपंडाव मांडला होता, व बागेंत फुलांची वायूबरोबर क्रीडा सुरू होती. वर, खालीं, मध्यें निष्पाप, निर्व्याज, मधुर आनंद ! आम्ही खेळत होतों, गप्पा मारीत होतों, मधून मधून भांडतही होतों. इतक्यांत वायूची एक मंदशी लहर आम्हांला सुखवीत आमच्या जवळून गेली. पुष्प सुगंधाची

खैरात करण्याचा तिचा विचार होता कीं, खालच्या निसर्ग बालांनीं आम्हांला पाठविलेली भेट देण्याकरतां ती आली होती, नकळे !

" अहा, किती मधुर वास सुटला आहे ! जन्मास यावें फुलांनीच ! स्वतःच्या सुकुमार देहाचा, दुसऱ्याच्या—आपल्या सारख्या कृतघ्न, निष्ठुर माणसांच्या सौख्याकरतां नाश करणें हीं स्वर्गीय देवतांचीं लक्षणें. तुला नाहीं असं वाटत तारानाथ ? "

" मला तर चांदणी व्हावसं वाटतं, " शशी मध्येंच उदार ी. " क्षणभर चमकून, दुसऱ्यांच्या नेत्रांनां सुखविणाऱ्या तारका धन्य नव्हेत असं कोण म्हणेल ? " तिचें बोलणें संपतें न संपतें तों व एक तारा खळकन् तुटला.

" शशी, तो बघ तारा तुटला. फार वरच्या पायरीवर चढलं कीं पडण्याची भीति असतेच. फुलांचं तसं नाहीं. निञ्चळ मातींत त्यांचा जन्म पण अंगच्या गुणानें देवाच्या पूज्य पदावर त्यांनां कायमची शान्ति मिळते. " मी म्हणालों.

" सर्वांनांच कांहीं हें भाग्य लाभत नाहीं तारानाथ ! कितीतरी फुलें मनुष्यांच्या निष्ठुर पदाघाताखालीं चुरगळलेलीं आपण पहातों. पुन्हां फुलं आज आहेत उद्यां नाहींत. असलं नाशवन्त जीवन काय कामाचं ? "

" आतांच तूं तारा तुटलेला पाहिलास. ताऱ्याचंच काय, पण कुणाचं जीवन शाश्वत आहे ? आपण ज्या जगांत वास्तव्य करतों तें जग तरी शाश्वत आहे ? आणि ' मुहूर्तं ज्वलितं श्रेयःनच धूमायितं चिरम् ' असं परवांच नाहीं का काकासाहेब म्हणत होते ? "

" कांहीं असो, मला चांदणीच व्हावंसं वाटतं—मी चांदणीच

होईन. तुला काय वाटतं ताई ? ”

“ मी चांदणीही होणार नाहीं व फूलही होणार नाहीं. आपल्या हातच्या का गोष्टी आहेत या शशी ? देवाजीनं दिलेल्या देहाला कंटाळून कसं चालेल ? फूल किंवा चांदणी कुणीं व्हावं ? तारानाथसारख्या कवीनं ! आपण आपलीं साधीं व्यवहारीं माणसं ! ”

“ फूल व्हायचं हा प्रश्न मीं नव्हता काढला. तो तुम्हां दोघी बहिणींचा प्रश्न ! आपण कवयित्री आहोंत हें सांगायचं होतं तर कुणी सरळ सांगायला नको म्हणत होतं ? तारानाथचें नांव मध्येंच कशाला ? ” मी हंसत उद्गारलों. तो निव्वळ विनोद होता आमचा. थोड्या वेळानें आम्हीं घरीं गेलों.

× × × × ×

सकाळचे सुमारें सहा साडेसहा झाले असतील. मी नुकताच उठलों होतों. तोंड धुवून, हातांत फुलांची परडी घेऊन, मी ललितेच्या बंगल्याकडे वळलों. आईला पूजेला फुलें आणून देण्याचा माझा नित्य-क्रम होता; आणि ललितच्या बंगल्या भोंवतालची जागा बरीच विस्तृत असून त्यांत, त्या हौशी भगिनीद्वयाच्या मेहनतीनें फुलेंही विपुल असत. ललित सुद्धां मजबरोबर फुलें खुडावयास येत असे.

मी बागेचें फाटक उघडलें मात्र—तोंच ओटयावर एक भयंकर देखावा मला दिसला. शशीचा परकर पेटला असून ती भयत्रस्त बाला आपल्या चिमुकल्या हातांनीं तो विझविण्याची खटपट करीत होती. खरें म्हटलें तर तो वसन्त ऋतु होता. सकाळच्या वेळेस थंड वाऱ्याची एकादीच झुळूक यावयाची; पण दैवच फिरलें ! वाऱ्यानें

अगदीं धुमाकूळ घातला होता. फुलांची परडी दूर भिरकावून मी शशीच्या मदतीस धांवलों. "परकर सोड शशी. मी तुझा भाऊ नाहीं का? मला काय लाजतेस?" पण अंहं! मलाही असलें दृश्य अपरिचित असल्यामुळें म्हणा, पण मी अगदीं गोंधळून गेलों. काय करावें हेंच मला सुचेना. सर्वांना हांका मारण्याचा मी अगदीं सपाटा लाविला; पण आपलें सुकुमार भक्ष्य हातांतून निसटूं नये म्हणून काळानें त्यांच्या कानावर हात ठेविला होता कीं काय कोण जाणे! शशीला सोडून वर जाण्यासही माझा धीर होईना. शेंवटीं तिला तशीच टाकून मी धांवतच वर गेलों. जेमतेम ती दुःखद्वार्ता त्यांना कळवून मी तेथेंच मटकन बसलों. भीति व दुःख यांच्या पकडींत पुरा सांपडल्यामुळें मला चक्कर आलें. थोड्या वेळानें मी शुद्धीवर येऊन डोळे उघडले. वर सर्वत्र सामसूम होती. शशी पार जळून गेली काय? शंका—कुशंकांची गाड्या मनांत एकच गर्दी उसळली. खालींही अगदीं शान्त होतें. माझें मस्तक बधीर झाल्या-मुळें मला तसें वाटत होतें कीं काय नकळे!

आज शशिकला एकटीच कशी? ललिता कुठें होती? आम्ही इतकीं वर्षें एकत्र होतों ना, पण ह्या दोघी बहिणींना विभक्त स्थितींत एकदाही पाहिल्याचें मला स्मरत नाहीं. सांवलीप्रमाणें त्या दोघी एके ठिकाणीं असत. मग आजच शशिकला एकटी कशी? तिला एकटी पाहूनच काळाला तिच्यावर आपला पाश टाकण्याचें धैर्य झालें. पण आधीं ती पेटलीच कशी? तुळशीची पूजा करीत असतां निरांजन लावल्यावर तिच्या परकरावर काडी पडली नसेल ना?

स्वतः काकीसाहेब, ललिता व शशिकला ह्या तिघी मोठ्या पहा-

टेस उठून, स्नान करून, तुळशीची पूजा करीत असत हें मला चांगलेंच माहीत होतें. ललिता जवळ बसली म्हणून काय झालें ? तुळशीचें तर आपल्या बालभक्तांचें रक्षण करणें कर्तव्य होतें ना ? देव सुद्धां कर्तव्यविन्मुख होऊं लागले तर ? पण देवाला कां दोष ? पूर्वजन्मींचें संचित हें ! हृदय व्याकुळ झाल्यामुळें माझ्या मनांत अशाच तऱ्हेचे आणखीही कांहीं विचार येत होते. बऱ्याच वेळानें मी उठलों व भीत भीतच खालीं गेलों. खोलीमध्यें केळीच्या पानांवर शशीला निजविलें होतें.

फूलच तें ! अग्नीच्या प्रखर उष्णतेनें तें कोमेजलें नाहीं तरच नवल ! अगदीं मलूल होऊन शशी पानांवर पडली होती. तिच्या उशाशीं ललिता अगदीं खिन्न होऊन बसली होती. मी आल्याचेंही तिला कळलें नाहीं. काकासाहेब टेबलाजवळ औषध करण्यांत गुंतले होते. आणि काकीसाहेब ? मातृहृदयच तें ! आणि शशी म्हणजे त्यांचा सहावा प्राण ! त्यांच्या हृदयांतील खळबळ त्यांनांच माहित ! कितीतरी वेळ मी दारांतच उभा होतों.

शेंवटीं मी जवळ गेलों व कुणाच्या सांगण्याची वाट न पहातां तेथेंच बसलों. सदासर्वदा आनंदी दिसणाऱ्या त्या घरावर काळाची भेसूर छाया आतांपासूनच दिसूं लागली. जळलेल्या कपड्यांचा वास सर्वत्र पसरला होता. थोड्याच वेळानें डॉक्टर आले. पांच मिनिटां-नंतर ते व काकासाहेब शशिकलेला तपासून निघून गेले. त्यांचे परीक्षण चालूं असतां मी एक सारखा त्यांच्या तोंडावर उठणाऱ्या विकार-तरंगांकडे पहात होतों. त्यांनीं केलेल्या आंबट चेहऱ्यावरून व पुढें घडलेल्या प्रकारावरून त्यांनीं काय निकाल दिला असेल ह्याचें

अनुमान सहज होण्यासारखें होतें.

अश्रूंची आंच हृदयाला लागल्यामुळें, जगांतलें आपलें कार्य तें लवकरच आटोपतें घेणार होतें. तो दिवस पौर्णिमेचा होता. सर्व जगावर रात्रीं चन्द्र आपला अंमल बसविणार. काल रात्रीं शशीनें प्रगट केलेल्या इच्छेची पूर्तता इतक्या लवकर होईल हें भविष्य आम्हांला कालच कळतें तर ? मग काय ? पृथ्वीतलावरील शशीचें व स्वर्गस्थ शशीचें मीलन होणार ? अरेरे ! शशीवांचून ललितेला कसें करमेल ? सर्वांची—खुद्द काकासाहेब व काकीसाहेब यांची सुद्धां—समजूत अशीच होती कीं ललितेच्या अंतःकरणांत भगिनी-प्रेमाचा ओलावाच नाहीं. पण असें कसें होईल ? ललितेचें हृदय रमणीहृदय होतें. प्रेम व रमणी यांना विभक्त करणें ब्रम्हदेवालाही केवळ अशक्य होय. ह्या नियमाला ललिताच कशी अपवादभूत होईल ? मी जाणतों ना तिचें अंतःकरण. त्यावेळीं मी लहान असेन कदाचित्; पण आतां ? अजूनही मी व ती एकत्रच रहात असूं. ईश्वर कृपेनें आम्हीं कधींच विभक्त न होवों. तिच्या अंतःकरणाचा कोंपरा न कोंपरा मीं वाचून ठेवला आहे. शशी भाजली त्यावेळची तिची करुण मूर्ति माझ्या नजरेसमोर अजून तशीच उभी आहे.

त्या दिवशीं आम्हां कोणालाच जेवण सुचलें नाहीं. हळूंहळूं संध्याकाळ होत आली. मावळत्या सूर्यनारायणाबरोबरच शशिकलेचा आत्माही जगाचा निरोप घेण्याच्या तयारींत असल्याचीं चिन्हें स्पष्टपणें दिसूं लागलीं होतीं. एका कोंपऱ्यांत बसून ललिता एकसारखी रडत होती. त्या वेळच्या माझ्या स्वभावाला साजे शोभेशी मी तिची समजूत घालीत होतों. पण अशा वेळीं दुःखी अंतःकरणाचें समाधान कसें होणार ?

दुसऱ्याला दुःखांत लोटण्याचें काम काळच करीत असतो, व त्यानंतर त्याची समजूतही काळच घालीत असतो. ' काल ' हेंच दुःखावर अप्रतिम गुणकारी औषध आहे. पण समजूत घालणें ही भोंवतालच्या लोकांचें कर्तव्य असतें.

रात्रीं दहा वाजण्याचा सुमार होता. आठ वाजतांच जेवणें वगैरे आटपून दादा व आई शेजारी गेलीं होतीं. बंगल्यामध्यें मी, अशोक व नोकरमंडळीवांचून कुणींही नव्हतें. अशोक केव्हांच झोंपीं गेला होता. मी मात्र गच्चीवर जाऊन बसलों होतों. एकान्त मिळतांच माझ्या मनांत विचारांचें एकच काहूर उसळलें. लहान असो कीं मोठा असो विचार काय कोणाला सुटला आहे ! काल आम्हीं किती आनंदानें गप्पा मारीत होतों, भांडत होतों. आजच्या प्रसंगाची कुणाला कल्पनाही नव्हती. काल शशीचे बोल शशीनें ऐकिले म्हणूनच आज आमची शशी स्वर्ग व मृत्युलोक यांच्या सीमारेषेवर घुटमळत होती. आज, फक्त आजचाच दिवस, चंद्राचें वास्तव्य आकाशांत होतें; पण उद्या—? विधात्यानें रेंखून ठेवलेलें भीषण भविष्य चन्द्राला तरी कुठें टाळतां येत होतें ! पण त्याला समाधानाची एक जागा होती. वसुंधरेला चन्द्राचा वियोग फक्त पंधरा दिवस सहन करावा लागतो. पंधरा दिवसांच्या दीर्घ भासणाऱ्या वियोगकालानंतर आपल्या धवल तेजानें सर्व जगताला हाच चन्द्र पुन्हां प्रमुदित करूं शकतो. पण शशी ? शशीसारखें रत्न एकदां हरपलें कीं हरपलेंच ! अशाच तऱ्हेच्या विचारांनीं माझें मन भरून गेलें होतें इतक्यांत एका भल्या मोठ्या काळ्याकुट्ट ढगाखालीं चन्द्र झांकून गेलेला मीं पाहिला. आकाशाच्या सम्राट पदावर विराजमान झालेला चन्द्र ! त्याचेंही अलौकिक सौंदर्य एका मेघानें

झांकून टाकिलें ! तोंच—!

" शशिकले, " शेजारच्या बंगल्यातून मला एक किंकाळी ऐकूं आली. हा तर काकीसाहेबांचा आवाज ! मृत्युनें आपले कार्य केलें वाटतें ? थोडासा धक्का बसल्या सारखें झालें. स्वर्गस्थ चन्द्राचें तेज मेघाखालीं लुप्त झालें त्याच क्षणीं—अगदीं बरोबर त्याच क्षणीं पृथ्वी-तलावरील शशिकलेला मृत्यूचें कधींही न सुटणारें खग्रास ग्रहण लागलें. पुष्पाचा क्षणभंगुर जीविताचा तिरस्कार करणाऱ्या शशिकले, आपलेंही जीवित असेंच क्षणिक आहे असें काल तुला वाटत होतें काय ? ज्या जगांत आपण वास्तव्य करतों तें जग सुद्धां नाशवन्त, अगदीं क्षणभंगुर आहे, हें तुझ्या मनाला पटलें नाहीं तर त्यांत नवल कसलें ?

सभोंवतालचें वातावरण आक्रंदनध्वनीनें पूर्णपणें भरून गेलें. असल्या वातावरणांत अत्यन्त निष्ठुर मनुष्याच्याही अंतःकरणाचें पाणी व्हायचें, मग मी तर काय ? वयानें लहान—शशिकला व ललिता यांचा खेळगडीच. मलाही आंता धीर धरवेना. शशिकलेला शेवटची पहाण्याची माझी इच्छा आतां अनावर झाली. ललितेची समजूत घालण्यास जावें काय ? पण अशोक घरांत राहील ! ह्या विचारांतच शेवटीं मी झोंपीं गेलों.

मी लहान होतों. मला कोण जाऊं देणार ? शेवटीं हट्ट धरून मी चवथ्या दिवशीं ललितेकडे गेलों. एका खिडकीजवळ गालावर हात टेंकून ती शून्यमनानें कोठें तरी पहात होती. डोळे अत्यन्त लाल व सुजलेले, नेहमींचें शान्त व प्रफुल्ल पण आज कोमेजलेलें उदास मुखकमल !

करुणमूर्ति ललिता माझ्या दृष्टीस पडतांच मला कसेंसेंच झालें. तिचें मजकडे लक्ष नव्हतें, तिच्या जवळ जाऊन मी तिला हांक मारली " ललिते ! " दचकूनच तिनें मजकडे पाहिलें.

" तारानाथ, शशिकलेला शेंवटीं शशीचेंच सान्निध्य अधिक प्रिय–" पुढें तिच्यानें बोलवेना.

"रडूं नकोस ललिते. आम्हां सर्वांनाच नाहीं का वाईट वाटत ?" पण अशा सांगण्यानें का कुणी गप्प बसत असतें ? दुप्पट जोरानें तिचें रडणें बाहेर पडलें. थोड्या—नव्हे बऱ्याच वेळानें ती शान्त झाली.

" ललिते, शशिकला एकटीच खालीं कशी राहिली ? "

" मला रात्रीं ताप आल्यामुळें सकाळीं मी उशीरां उठल्यें. मी वर स्नान करीत होतें. शशीला मीं थांबावयास सांगितलें पण तिनें माझें ऐकिलें नाहीं. "

" काय ललिते, शशीनें तुझें ऐकिलें नाहीं ? " आश्चर्य चकित होऊन मीं पृच्छा केली. ललितेचा एकही शब्द शशी खालीं पडूं देत नसे; उलटपक्षीं शशिकलेची कुठलीही विनंति ललिता अमान्य करीत नसे. इतकें त्यांचें परस्परांवर प्रेम व भक्ति असे. मग शशीनें ऐकिलें नाहीं हें कसें ? पण ह्यांत तरी अशक्य काय होतें ? म्हणतात ना 'विनाश काले विपरीतबुद्धिः ' " पण काकीसाहेब तिला कशा विसंबल्या ? "

" त्या दोघींची पूजा झाली होती. आईनें उपकरणीं गोळा केलीं, शशी प्रदक्षिणा घालीत होती. ' मी आत्तां येत्यें तूं जा ' असें तिनें आईला सांगितलें. काळानेंही आईला मोहनी घातली. अगदीं पांचच

मिनिटानें तुझी किंकाळी आम्हीं ऐकिली. पूजेचीं उपकरणीं सुद्धां खालीं ठेवलीं नव्हतीं. इतक्या अल्पकालांत अशी भयंकर गोष्ट घडून आली."

पण आतां शोक करून काय उपयोग ? क्षणभर चमकून दुसऱ्याच्या नेत्रांना सुखविण्याकरितां, आपल्या स्वर्गीय क्रीडेनें उदासहृदयाला उल्लसित करण्याकरितां शशिकला स्वर्लोकीं निघून गेली. ती काय परत येणार आहे ?

कु. इंदुमति आर्ते.

कळी ५ वी

माझी मंजुळा–

—१—

कांहीं वर्षें शंकररावांच्या सर्कशींत घालविल्यानंतर गेल्या दोन तीन वर्षांपासून मी प्रो. × × × × यांच्या सर्कशींत मॅनेजर म्हणून काम करीत होतों. पुढें × × × × यांनीं सर्कशीचा व्याप सोडून देऊन स्वतंत्रपणें व्यायामप्रसार करण्याचें ठरविल्यामुळें आम्हांला अर्थातच नारळ मिळाला. परंतु हा नारळ यशस्वी होता यांत शंका नाहीं. कारण एक महिन्याच्या आंतच मला इंडियन × × × × सर्कशीच्या मालकाकडून त्यांच्या सर्कशीचा मॅनेजर होण्याविषयीं विनंतीवजा पाचारण आलें आणि, मींहि तें मोठ्या आनंदानें स्वीकारलें.

मला ह्या सर्कशींत येऊन दोन तीन महिने झाले असतील. आठदहा दिवसांपूर्वीं माझा मित्र ' बाळ ' याजकडून मला एक पत्र आलें होतें. पत्र वाचून मला खरोखरच मोठें आश्चर्य वाटलें. बाळ आणि मी मॅट्रिकपर्यंत एकाच वर्गांत होतों. पुढें मी सर्कशींत राहिलों व बाळ कॉलेजमध्यें जाऊं लागला. तो जात्या कुशाग्रबुद्धीचा असल्यामुळें लवकरच वेदांत विषय घेऊन बी.ए.मध्यें पहिल्या वर्गांत उत्तीर्ण झाला. बाळ आतां लवकरच लग्न करून संसार थाटील असें मला वाटलें होतें. परंतु त्यानें तसें कांहीं न करतां निव्वळ वाचन, मनन आणि जनसेवा करण्याचा निश्चय केला. एका खेडेगां-

वांत जाऊन त्यानें आपलें कार्य करण्याचा विचार केला. परंतु त्याचा वेदांत खेड्यांतील जनतेला पटला नसावासें दिसतें. कांहीं दिवस त्यानें एका सावकाराची खंडानें जमीन देखरेख नांगरायला घेतली. पण याहि उपक्रमांत त्याला बरें वाटलें नाहीं. खेड्यांतून शहरांत जावें आणि आयुष्याला कांहीं वळण मिळाल्यास पहावें, या हेतूनें तो मुंबईस आला. परंतु खेड्यापेक्षां शहरांत पोटाचा प्रश्न सोडविणें कठीण जात असल्यामुळें त्यानें एका वर्तमानपत्राच्या ऑफिसांत नोकरी पत्करली. आणि याच नोकरीवर असतांना, काय बिनसलें देवाला माहित—वर सांगितल्याप्रमाणें त्याचें एक मला पत्र आलें. पत्रांतील मजकुर फारच थोडा होता. "मीं काय करावें, हें मला सुचेनासें झालें आहे. सुकाणूं नसलेल्या नौकेप्रमाणें माझी स्थिति झाली आहे. तुझ्या सर्कशींत मला कुठें तरी लावून दे."—अशा आशयाचें तें पत्र होतें. मला पत्र वाचून अर्थांतच वाईट वाटलें. एका सुशिक्षीत तरुणाची काय ही दशा! आलेल्या परिस्थितीशीं टक्कर देण्याच्या हेतूनें मी आमच्या मालकाला बाळच्या नोकरी संबंधानें विचारलें. सुदैवानें त्यानें होकार दिला. मींहि बाळला ताबडतोब पत्र धाडून बोलावून घेतलें.

बाळला आमच्या सर्कशींत येऊन दोन तीन दिवस झाले असतील. हिशेब ठेवण्याचें, व मंजुळेचें तारेवरील काम चालत असतांना रंगणांत उभें राहण्याचें, अशीं दोन कामें आम्हीं त्याला दिलीं होतीं. आज सकाळीं बाळ माझ्या तंबूवर आला होता. त्याचा चेहेरा बराचसा प्रसन्न दिसल्यावरून मी म्हणालों, "सर्कस मानवली म्हणावयाची ?"

" तुझा उपकार मीं कधींहि विसरणें शक्य नाहीं. "

" यांत उपकार कसला ? मी माझें कर्तव्यच केलें. तुझ्या उपयोगी नाहीं पडावयाचें मग कुणाच्या ? छे ! छे !! अशी उपकार मानण्याची भाषा बोलूं नकोस. "

" अजूनपर्यंत माझ्या हातून वाचेप्रमाणें कृति घडली नाहीं...."

" अरे, असा मधेंच कां अडखळलास ? एकाएकीं बोलेनासा कां झालास ? आणि तुझ्या डोळ्यांत हे अश्रू ! बाळ, तुला वाईट का वाटतें ? "

बराच वेळ बाळ कांहीं बोलला नाहीं. नंतर तो अडखळत म्हणाला, " तूं माझा धिक्कार करणार नाहींस ना ? माझें ध्येय...."

" छे ! छे !! भलतेंच कांहीं तरी ! सर्वांचेंच ध्येय का सिद्धीस जात असतें ? तुझें ध्येय यशस्वी झालें नाहीं म्हणून तुझा धिक्कार मीं काय म्हणून करावा. बरें, पण तुला इथें बरें वाटतें ना ? कामाचा तुला त्रास नाहीं ना ? "

" मुळींच नाहीं. येथें आल्यापासून माझ्या मनोवृत्तींत बराच बदल झाला. अगदीं शून्य अन्तःकरणाने शोधीत असलेली वस्तू सांपडावी, त्याप्रमाणें मला झालें आहे. मंजुळा तारेवर काम करीत असतांना एखाद्या सुमंगल देवतेप्रमाणें भासते. हृदयांत कोरडा पडलेला प्रेमाचा झरा मंजुळेनें झुळूझुळू वाहविण्यास लावला आहे. या बद्दल मी तुझा आणि मंजुळेचा फारफार आभारी आहें. "

× × × ×

—२—

संध्याकाळची वेळ. सहा साडेसहा झाले असतील. तळयावर पाणी पिण्याकरितां गेलेले आमच्या सर्कशींतील हत्ती झुकतेच डुलत डुलत परत यायला लागले होते. पुढच्या हत्तीचें शेंपूट मागच्या हत्तीच्या सोंडेंत, त्याचें त्याच्या मागच्या—अशी ती पांच सात हत्तींची रांग पाहून मनाला मोठा आनंद झाला. हत्तीच्या लीला पाहून कोणाला हसूं येत नाहीं? हत्तीकडे पाहिलें ना पाहिलें कीं मला एखाद्या बुद्धिमान् परंतु गबाळग्रंथी आणि थिल्लर तुंदिलतनु शालजोडी–पंडिताची आठवण होते! सर्व कारभार आपला दरबारी!! त्या दरबारी थाटाच्या व नवाबी मनोवृत्तीच्या हत्तींकडे थोडा वेळ बघून मी सर्कशीच्या तंबूंतील व्यवस्था नीट लागली किंवा नाहीं हें पाहूं लागलों. तंबूंतील सर्व व्यवस्था नीट लागलेली पाहून मी बाहेर आलों व थोडासा फेरफटका मारावा या हेतूनें आमराईच्या मार्गाला लागलों.

सूर्य अजून अस्ताला गेला नव्हता. परंतु तो लवकरच जाण्याच्या बेतांत होता. आम्रवृक्षांवरील मोहोर कांहींसा केशरी व कांहींसा किरमिजी रंगाचा दिसत होता. मोहोरावर नाजुक सूर्यप्रकाश पडल्यानें तर तो फारच बहारीचा व एखाद्या तरुणीच्या गोड व लाजऱ्या चेहेऱ्याप्रमाणें मोहक दिसत होता. ह्या सौंदर्याची जाणीव होऊनच कीं काय, कांहीं कोकिळा आपल्या कर्णमधुर कंठांतून सुरेल गाणीं गाऊं लागल्या. त्यांत मौज ही कीं, कोण चांगलें गाणें म्हणते अशी त्यांच्यांत चढाओढ लागली होती. त्या गोड स्पर्धेचा गोड अनुभव घेत मी हुळहळु चाललों होतों. इतक्यांत सूर्यबिंब दिसेनासें झालें, आणि पश्चिमदिक्सुंदरीनें मारलेली प्रेमरंगाची पिचकारी सूर्यावर

न पडतां तशीच सारें गगनमंडळ रंगवीत सुटली.

मी पुढें जाऊं लागलों. इतक्यांत समोरून बाळ येतांना दिसला. आम्हीं दोघेंहि एकमेकांकडे पाहून हंसूं लागलों. बाळची मुद्रा कांहीं विलक्षण प्रफुल्लित दिसत होता. संधिप्रकाशांत तो फारच सुंदर दिसत होता. मला पाहतांच तो म्हणाला, " तुला एक आनंदाची बातमी कळवायची आहे. "

" मला ? अरे, वा ! कळूं तरी दे. "

" तूं माझी थट्टा करणार नाहींस ना ? नाहींतर म्हणशील बाळ रोमान्सच्या मागें लागला आहे ! "

" आणि तसें कांहीं असलें म्हणून काय झालें ? तुझ्यासारख्या तरुणानें वेदांती बनणें कांहीं चांगलें नाहीं. सर्व गोष्टी वयाप्रत केलेल्या शोभतात. "

" मी इथें आल्यापासून माझें आयुष्य मला आनंदमय वाटूं लागलें आहे. ज्या सौंदर्याला मी आजपर्यंत पारखा बनलों होतों त्या सौंदर्याचीं कारंजीं माझ्यासमोर नाचूं लागलीं आहेत. ज्या प्रीतिदेवतेचा अवमान करुन मी खेड्यांत चालता झालों होतों तीच देवता मंजुळेच्या रूपानें माझ्यावर अनुग्रहाची पाखर करीत आहे. "

" तूं काय बोलतोस हें मला स्पष्टसें कळत नाहीं. "

" मंजुळेनें—मी तिला कांहीं शिकवावें म्हणून मला काल विनंती केली. आणि मींहि ती आनंदानें स्वीकारली. "

" परंत मंजुळेचें शिक्षण बरेंच घरीं झालें आहे. तूं तिला काय शिकविणार ? तिची आई मॅट्रिकपर्यंत पुण्यास शिकली आहे. घरच्या

गरिबीमुळें तिला (आईला) आमच्या बाबासाहेबांशीं (सर्कशीचें मालक) लग्न करावें लागलें. तिनेंच मंजुळेला सारें शिक्षण घरीं दिलें."

"होय, तें मला मंजुळाच म्हणाली. मीं तिला 'कुमारसंभव' शिकविण्याचें ठरविलें आहे."

"हीच का आनंदाची बातमी?"

"नाहीं. मंजुळेचें माझ्यावर...."

"काय? असा अडखळतोस कां?"

"मंजुळेचें माझ्यावर प्रेम जडलें आहे. परंतु लग्न न करण्याच्या माझ्या तत्त्वनिष्ठेमुळें मला तिच्या विनंतीला मान देतां येत नाहीं."

"आणि हीच का आनंदाची बातमी!"

"नाहीं. आजन्म अविवाहित राहून आम्हीं उभयतांनीं बहिण भावंडाच्या नात्यानें राहण्याचें ठरविलें आहे."

"आणि हीच कां आनंदाची बातमी?"

× × × ×

—२—

'बाळनें केलें हें बरें केलें का?'—असें मी माझ्या मनालाच विचारीत होतों. पूर्वीपासूनच त्यानें लग्न करावें या विचाराचा मी होतों. तेव्हां नाहीं तर नाहीं, आतां तरी त्यानें विचार करायला नको होता का? मंजुळेसारख्या सुविद्य आणि सुशील मुलीनें स्वतःचें हृदय अर्पण केलें असतां त्यानें त्याचा अवमान करावा, हें माझ्या दृष्टीनें बरें झालें नाहीं. त्यांतूनहि तिच्यावर बाळचें प्रेम नसतें तर निराळी गोष्ट होती. दोघांचें एकमेकांवर प्रेम असूनही निव्वळ हेके-

खोरपणामुळें बाळ स्वतःच्या तसेंच मंजुळेच्या सुखांत नकळत माती कालवीत आहे, असें मला वाटलें. मी बाळला या संबंधांत चार शब्द सांगण्याचें योजिलें. परंतु काय झालें कुणाला ठाउक ? गेल्या तीनचार दिवसांपासून तो माझ्याशीं बोलण्याचेंच टाळीत आहे. मला पाहिल्या-बरोबर तो दुसरीकडेच जाऊं लागतो. हें असें कां ? याचा मला पत्ता लगेना. मी मनाशींच विचार करीत असतां एका गड्यानें माझ्या हातांत एक चिठ्ठी आणून दिली. अक्षर पाहून मी थोडासा चकीत झालों. चिठ्ठी बाळकडून आली होती.

" अलीकडे मी तुझ्याशीं बोलणें सोडलें आहें. स्वतःचें तोंड देखील तुला दाखवायला मी लाजतों ! हें असें कां, याचा तूं आपल्या मनाशीं विचार करीत असशील आणि स्वतःकडे दोष लावून घेत असशील परंतु मीच खरा दोषी आहें. खरा पापी मीच आहें. माझें ध्येय कोणतें होतें आणि मी लागलों आहें कोणत्या पंथाला ? माझ्या विचारांत विलक्षण क्रांति झाली आहे. माझे विचार नीच बनत चालले आहेत. जिच्याशीं पवित्र भावाच्या नात्याचा संबंध मी जोडला, तिच्याविषयींच माझ्या मनांत वाईट विचार घोळत आहेत. ह्यापेक्षां अधोगति ती आणीक कोणती ? माझ्या हातून चूक होत आहे हें मी जाणतों. परंतु माझें मन कमकुवत असल्यामुळें भीति वाटतें. परमेश्वर मला मदत करील काय ?

" माझे विचार वाचून तुला माझी चीड येईल. मी दुष्ट पापी आहें, असेंहि तुला कदाचित् वाटेल. तसें वाटणें साहजिक आहे. तुला मी दोष देत नाहीं. परंतु मी खरोखरीच कां दुष्ट आणि पापी आहे. मला वाटतें या प्रश्नांचें उत्तर देवच देऊं शकेल.

× × × ×

—४—

बाळची ती विचित्र चिठ्ठी आल्यानंतर दोन दीवसांची गोष्ट. मध्यरात्रीचा समय. सर्कशीचा खेळ आटपून दीड एक तास सहज झाला असेल. व्याघ्रसिंहांच्या गर्जना होईनाशा झाल्या होत्या सर्कशीच्या मुख्य तंबू भोंवतालचें वातावरण निःशब्द झालें. मधून मधून कांहीं घोड्यांच्या टापांचा आवाज एकूं येई तेवढाच. येरव्हीं सर्वत्र शून्यच होतें. खेळ संपल्यावर एक कप कॉफी पिऊन नंतर झोपीं जाण्याचा माझा परिपाठ असे. आमच्या सर्कशींतील कांहीं ' आर्टिस्ट ' त्यावेळीं जेवीतहि असत. परंतु माझें तसें कांहीं नव्हतें त्यामुळें आजहि खेळ संपल्यावर हिशोब वगैरे जुळवून मी माझ्या तंबूंत येऊन स्टव्ह पेटविला. कॉफी करून पिण्यांत माझा अर्धातास गेला असेल नसेल. मी कॉटवर पडल्या पडल्या रविन्द्रनाथांचें ' गीताञ्जली ' हें काव्य वाचीत होतों. इतक्यांत चंद्रोदय झाला असावा. कारण मुख्य तंबूवरील रेशमी पताका चकाकूं लागली. मी बाहेर येऊन पाहिलें तों खरेंच, कृष्णपक्षांतील अष्टमीचा चंद्र आकाशांत विहार करीत होता. आसमंतांतील साऱ्या प्रदेशावर त्याच्या रुपेरी किरणांनीं मौजच मौज उडवून दिली होती. वारा मंदमंद वहात होता. अशा वेळीं स्वच्छंदानें कोणाला फिरावेसें वाटत नाहीं ? मध्यरात्रीं प्रकाशित होणाऱ्या चंद्राचें सौंदर्य काहीं और असतें. त्यांतील स्वारस्य अनुभवाखेरीज कळायचें नाहीं. मला अशा वेळीं फिरण्याची संवय असल्यामुळें ' गीताञ्जली ' तशीच टाकून मी तंबूबाहेर पडलों. पूर्वेच्याच दिशेनें मी चाललों होतों. माझ्यासमोर विस्तीर्ण मैदान पसरलें होतें. ईश्वराच्या अनंततत्वाबद्दल मनाशीच विचार करीत मी त्या चंद्रप्रकाशरूपी क्षीरसागरांत

स्वैरपणें विहार करीत होतों. माझ्या क्रीडेला कोणी प्रतिबंध करणारा नव्हता. मी आणि माझा परमेश्वर--आमच्या दोघांचेंच हितगुज चाललें होतें. बाह्यतः सारें विश्व झोंपीं गेल्यासारखें दिसत असूनहि तें चैतन्यानें रसरसल्यासारखें वाटत होतें. प्रत्येक जड पदार्थ शब्द-रूपरसगंधादि भावनांनीं सचेतन झाल्यासारखा दिसूं लागला. वाऱ्याला देखील सदेहत्व प्राप्त झालें असावें. कारण एखाद्या बालकाच्या पाठीवरुन हात फिरविला असतां, ज्याप्रकारची गोड संवेदना उत्पन्न होते, तसाच प्रकार आपल्या भोंवतालच्या वातावरणांत हात फिरविल्यानें मला अनुभवायला सांपडला.

परंतु देवाच्या दरबारांत असें कितीवेळ रहायला सांपडणार ? जगाचें अस्तित्व असेंपर्यंत पुनःपुनः पृथ्वीवर अवतरावें लागणारच. मी चाललों होतों इतक्यांत मोठमोठाले वृक्ष मार्गाआड येऊं लागले. आपण बरेंच दुरवर आलों असें मला वाटलें. पुनः परतावें म्हणून मीं मागें पाय घेणार तोंच माझ्या कानांवर " मंजुळा ! मंजुळा ! ! " असे शब्द पडले. मी आवाज ओळखला. परंतु मनाला खात्री वाटेना. मध्यरात्रींच्या वेळीं तो कशाला इथें येईल, असें वाटलें. मनाला कांहीं तरी भास झाला असेल म्हणून मी तिथून जाण्याचा निश्चय केला. पण पाऊलच पुढें टाकवेना. ज्याचा आपणाला संशय आला तो इथें असल्यास पहावें म्हणून मी इकडे तिकडे पाहूं लागलों. पांच दहा मिनिटें अशीं पाहण्यांत गेलीं असतील. इतक्यांत माझा तर्क खरा ठरला !

बाळ एका झाडाखालीं बसला होता. त्याचे डोळे मिटलेले होते. त्याच्या शरीराची कुठल्याच प्रकारची हालचाल होत नव्हती. इतक्या

ध्यानमग्न स्थितींत तो बसला होता. हें ध्यान कसलें होतें तें सांगण्याची जरुरी आहे असें नाहीं. मी बाळजवळ जाऊन म्हणालों, बाळ.... बाळ. "

" कोण ? मंजुळा...."

" नाहीं. बाळ, मी आहें. तूं इतक्या रात्रीं इथें कां आलास ? "

बाळ कांहींच बोलेना. तो माझ्या मांडीवर डोकें ठेवून रडूं लागला. मलाहि वाईट वाटलें, मी त्याच्या अंगावरुन हात फिरवीत म्हणालों " बाळ. बाळ. " परंतु दुःखाचा उमाळा त्याला ज्यास्तच जोरानें आला ! त्यानें मला घट्ट आवळून धरलें. मीहि त्याच्या असहाय स्थितीकडे बघून त्याला प्रतिबंध केला नाहीं. पंधरा वीस मिनिटें अशा भावनोत्कटतेंत गेलीं असतील. नंतर मी पुनः बाळला कुरवाळीत म्हणालों, " बाळ, तुला कसलें दुःख होत आहे ? "

" मी तुझा अपराधी आहें. मला क्षमा कर. "

" अपराध कळल्याखेरीज क्षमा कसली करायची ? तूं गेल्या आठ दिवसांपासून माझ्याशीं बोलायला टाळतोस ह्याचा अर्थ काय ? तुला इथें करमत नाहीं का ? बाबासाहेब तुला कांहीं बोलले का ? "

" मी परमेश्वराचा आणि तुम्हां सर्वांचा अपराधी आहें. मला क्षमा करा. "

" पुनः तेंच. बाळ, मी तुझा मित्र ना ? मग माझ्याजवळून सत्य कां लपवून ठेवतोस. "

" माझ्या सत्यानें तुझे कान विटाळले जावेत, असें मला वाटत नाहीं. माझें सत्यकथन म्हणजे कमकुवत हृदयाचा इतिहास. त्या

इतिहासानें तुझेंहि कल्याण व्हायचें नाहीं; आणि जगाचें तर नाहींच नाहीं. "

" बाळ, असं काय करतोस ?"

" तुम्हीं सर्व देवाघरचीं माणसं आहांत. मीच तेवढा या मातींतून जन्माला आलों आहें. मी पापी आहें. मी तुमचा आणि मंजुळेचा अपराधी आहें. "

" अरे ! तूं पुन्हां रडूं लागलास ! ! बाळ तूं पदवीधर सुशिक्षीत ना ? "

" म्हणूनच रडतों.........तुसत्या बहिण भावाच्या नात्यानें माझें समाधान....मी मंजुळेचा अपराधी आहें.....तिनें विनंती केली असतांना मी ती नाकारली !........आणि आतां ती माझी व्हावी असें मला वाटतें....कोणीं तरी अगदीं आपलें आपलें मनुष्य या वयांत हवें....त्या खेरीज आयुष्याला पूर्णत्व येत नाहीं....मंजुळा माझ्या जवळ असून मला दुरावल्यासारखी झाली आहे....आणि अजूनही मंजुळा माझी मंजुळा होईल....पण या हृदयांत कांहीं तरी उज्ज्वल तत्त्व आहे आणि मला माझ्या भावना अश्रूंनीं पावन करून घ्याव्या लागत आहेत........"

" असल्या तत्त्वनिष्ठेला काय नांव द्यावें तेंच कळत नाहीं ! "

× × × ×

—५—

'डबल बारावरील' काम नुकतेंच संपलें होतें. आमचे 'रिंग-मास्तर' स्वतःचें अश्वारोहणांतील कौशल्य प्रेक्षकांना दाखवून वाहवा मिळवीत होते. त्यांचें काम संपल्यावर एका विदूषकानें येऊन बराच वेळ

लोकांचें मनोरंजन केलें. आणि नंतर मंजुळेची पाळी आली. तिच्याकडे तारेवरील काम होतें. सर्कशीचा बँड सावकाश आणि मधुर वाजूं लागला. स्वतःच्या कर्तबगारीनें मंजुळेनें नांवलौकिक मिळविला होता. सर्वांचें लक्ष तिच्या येण्याकडे लागलें. इतक्यांत मंजुळेनें प्रवेश केला. लोकांनीं टाळ्या वाजवून तिचा मनापासून सत्कार केला. मंजुळेनें फारच मोहकपणें सर्वांना नमन केलें आणि, तार बरोबर बसली आहे किंवा नाहीं हें पाहिलें. नंतर ती कांहीं वेळ तंबूच्या द्वाराकडे बघत राहिली. कोणाची तरी ती उत्कंठेनें वाट पहात होती. मी जवळ उभा होतों. माझ्याजवळ येऊन ती हळूंच म्हणाली "बाळ कुठें आहेत ?"

"त्याची प्रकृति बरी नाहीं."

"त्यांनीं इथें यायचें कबूल केलें होतें."

"पण त्याला बरें नसेल...."

"त्यांना म्हणावं नुसतेच इथें येऊन बसा. ते आल्यांखेरीज मी तारेवरील काम करणार नाहीं." असें म्हणून मंजुळा शिडीनें तारेवर चढली आणि आपलें काम करूं लागली. पहिल्याच कामांत तिनें लोकांचीं मनें आकर्षण करून घेतलीं. मी बाळला बोलवायला म्हणून त्याच्या तंबूत गेलों. तो आपल्या कॉटवर निजला होता. मला पहातांच त्यानें मंदस्मित केलें. मी म्हणालों, "बाळ, तूं आल्याखेरीज मंजुळा सायकलचें काम करीत नाहीं. तूं नुसता येऊन बैस. तूं तिला कबूल केलें होतेस ना ?

"भारीच हट्टी पोर...." असें म्हणत बाळ माझ्या बरोबर कपडे घालून यायला निघाला. थोड्याच वेळांत आम्ही तंबूजवळ

आलों. मंजुळेचें काम चाललेंच होतें. बँडच्या मधुरवादनाची तिला साथ मिळाली होती. लोक एकाग्रतेनें तिच्याकडे पहात होते. बाळ आलेला पाहतांच ती त्याच्याकडे बघून हंसूं लागली. बाळहि हंसला आणि जवळच्याच एका खुर्चीवर बसला.

मंजुळा तारेवरून खालीं आली. ह्यापुढें तिचें सायकलचें काम होणार होतें. मध्यंतरी तिला विश्रांति मिळावी म्हणून एका जोकरनें येऊन बळेंच तारेवर उलट सुलट उड्या मारल्या. आम्हीं बसलों होतों तिथें मंजुळा आली आणि बाळकडे बघून म्हणाली, "का येणार नव्हतात ना ? मग कां आलांत ?" मंजुळा हंसूं लागली. बाळहि हंसत हंसत म्हणाला, "मी कां आलों हें तुला माहित !"

मंजुळा म्हणाली, "अस्सं ! अस्सं ! !"

तारेवरील सायकलचें काय सुरूं झालें. प्रेक्षकांकडून टाळ्यांचे गजरावर गजर होऊं लागले. मंजुळा तारेवर एखाद्या विद्युल्लतेप्रमाणें, क्षणांत इकडे तर क्षणांत तिकडे, चमकूं लागली. लोक चकित झाले. मंजुळेचें शेवटलेंच तारेवरील सायकलपैकींचें काम बाकी राहिलें होतें. तिच्या हातांतील जपानी छत्री स्थीर झाली. तिनें सायकलीचें पुढील चाक वर उचललें देखील ! आणि इतक्यांत काय झालें कुणाला माहित, मंजुळेचा झोंक जाऊन ती खालीं पडली. सर्व तंबू स्तब्ध झाला. मी व बाळ मंजुळेजवळ गेलों. तिचें डोकें कनातीच्या खिळ्यावर आदळल्यानें त्यांतून रक्तस्राव होत होता. ती बेशुद्ध स्थितींत होती. तिला 'स्ट्रेचर' वर घालून आम्ही बाबासाहेबांच्या तंबूवर गेलों. सर्कशीचा खेळ पुढें चालवायला आम्ही 'आर्टिस्ट' लोकांना सांगितलें. परंतु प्रेक्षकवर्गच मंजुळेला झालेल्या अपघातानें

इतका दुःखाकुल झाला होता कीं, त्यानें स्वयंस्फूर्तीनें पुढचा खेळ न पहातां आपापल्या घरीं जाण्याचें ठरविलें. कांहीं मंडळी मंजुळेच्या प्रकृतिविषयीं विचारूं लागली. त्यांचे आम्ही गोड बोलून समाधान केलें. सर्व लोक चालते झाले. बाबासाहेबांच्या घरांतील मंडळी, मी, मंजुळेची आई, बाळ आणि आमचे डॉक्टर इतकी सर्व मंडळी मंजुळेच्या शुश्रूषेंत होतों. जवळजवळ अर्ध्यातासानें मंजुळा शुद्धीवर आली. तिच्या तोंडांतून पहिलेच शब्द निघाले ते हे होते. "बाळ, बाळ !" बाळ मंजुळेजवळ गेला. त्यानें तिचा हात आपल्या हातांत घेतला. मंजुळेच्या डोळ्यांत आंसवें उभीं राहिलीं. बाळच्याहि डोळ्यांतून सारखे घळघळ पाणी वाहात होतें

× × × ×

—६—

मंजुळेच्या डोक्याला जबर जखम झाली होती. ती भरून यायला आठ दहा दिवस लागले. पायाच्या कांहीं बोटांतील हाडेंहि मोडलीं होतीं. ती दुरुस्त व्हायला पांचसहा दिवस लागले. ज्या दिवशीं अपघात झाला त्या रात्रीं व दुसऱ्या दिवशीं रात्रीं मंजुळेला फार ताप आला. बाळची प्रकृति बरी नसूनहि तोच मंजुळेची रात्रंदिवस शुश्रूषा करीत असे. तिची सेवा करीत असतांना त्याचा चेहेरा विलक्षण आनंदी दिसें. प्रतिदिवशीं त्याची शरीरप्रकृति खालावत चालली होती. परंतु त्याच्या मुखावरील गांभीर्य आणि शांति वाढतच चालली होती. आज सकाळीं नवाच्या सुमारास मी बाबासाहेबांच्या तंबूवर गेलों होतों. इतर मंडळींशीं गप्पा न मारतां मी सरळ जिथें मंजुळा निजली होती तिथें गेलों. मंजुळेची प्रकृति आतां बरी होती. तिच्या

तोंडावर पुनः सतेजता दिसूं लागली. मला पाहातांच तिनें उठण्याचा प्रयत्न केला. परंतु जवळ बसलेल्या बाळनें तसें करूं दिलें नाहीं. मी तिच्या बिछान्याजवळ एका खुर्चीवर बसलों. बाळच्या हातांतील 'कुमारसंभव' पाहून मी म्हणालों, "बाळ, मंजुळाताई आजारी असतांना तूं त्यांच्यामागे अभ्यासाचा हा लकडा काय लावला आहेस ?"

"तिलाच विचार, ती हट्टी आहे."

"मींच म्हणालें कुमारसंभव वाचा म्हणून. नुसता निजून राहण्याचा बाई कंटाळा येतो. कालिदासाच्या लेखणींतून उतरलेलें हिमालयाचें सुंदर वर्णन बाळच्या तोंडून ऐकण्यांत मला मोठी मौज वाटतें. स्वतः बाळ देखील वाचीत असतांना तल्लीन होतात. शिवाय आईनें परवानगी दिली आहे."

"आतां तुमची प्रकृति बरी आहे ना ? आम्हांला मोठी भीति पडली होती. त्या दिवशींची रात्र मोठीच आणीबाणीची होती. देवानें खैर केलं म्हणून ठीक. आमच्यातर तोंडचें पाणी पळालें होतें."

"माझी प्रकृति आतां चांगली आहे. प्रकृति बरी होण्याचें श्रेय सर्वस्वी बाळ यांना आहे. त्यांच्या प्रेमळ सहवासामुळें माझें दुखणें इतक्या लवकर बरें झालें....त्यांचे उप...."

"मंजुळे, फार बोलूं नकोस. तुझा जीव घाबरूं लागेल. स्वस्थ पडून राहा. मी तुझ्याजवळ बसलों आहें."

बाळचा हात आपल्या हातांत घेत मंजुळा म्हणाली "बाळ...."

पुढें ती कांहींच बोलली नाहीं. बाळनें तिच्या डोळ्यांतील अश्रू स्वतःच्या रुमालानें पुशिले, आणि मला जाण्याविषयीं खूण केली.

मी माझ्या तंबूकडे लागलीच निघून आलों व मनाशींच पुटपुटलों, " दोन प्रेमी जीव एक होण्याआड बाळची तत्त्वनिष्ठा येत आहे. देवा तूं काय योजिलें आहेस ? "

× × × ×

—७—

आणिक सात आठ दिवसानंतर मंजुला हिंरूंफिरूं लागली. परंतु बाळला मात्र पथारीवर खिळून पडावें लागलें. त्याला अलीकडे बारीक ताप येऊं लागला होता. त्याची प्रकृति ज्यास्त ज्यास्त क्षीण होऊं लागली. मीं त्याला माझ्या तंबूमध्येंच आणून ठेविलें होतों. त्याची शुश्रूषा करण्याची जवाबदारी माझ्यावरच होती. व मीहि ती निरलसपणें बजावीत होतों. पण एक दिवस आमच्या डॉक्टरांनीं मला माझ्या मित्राच्या प्रकृतिविषयीं कटु निदान कळविलें. बाळला क्षय झाला होता आणि तोहि असाध्य स्थितींतला होता ! माझ्या मनानें माघार घेतली. ' आपण बाळला मुकणार '—हा एकच विचार माझ्या डोक्यांत निरंतर घोळत असे. मी त्याची सेवाकरण्यांत मुळींच कमी केलें नाहीं. परंतु माझें मन उदासीन बनलें.

थोडीशी आश्चर्याचीच गोष्ट खरी. पण बाळच्या चेहेऱ्यावर विलक्षण समाधान अलीकडे दिसत असे. शरीर जरी त्याचें क्षीण होत चाललें होतें, तरी आंतील आत्मा अधिकाधिक सतेज होत होता. आपण आतां लवकरच जाणार असें बाळला देखील वाटत असावें. कारण एक दिवस मी त्याच्याजवळ बसलों असतांना तो म्हणाला

" माझें काय होणार हें स्पष्ट दिसतें आहे. आयुष्यांतील माझें ध्येय सिद्धीस गेलें नाहीं हें खरें. पण त्याबद्दल मला वाईट वाटत नाहीं. पुढील जन्मीं मी तें सिद्ध करून दाखवीन. माझा पुनर्जन्मावर गाढ विश्वास आहे. मला येथून जातांना एकच समाधान वाटतें कीं, मरणापूर्वी तरी माझ्या हातून मंजुळेची सेवा झाली. जन्म घेऊन कदाचित् माझ्या नशिबीं येवढेंच सत्कार्य लिहिलें असेल. मंजुळेची सेवा करायला सांपडावी म्हणूनच मी जिवंत होतों म्हणेनास. माझ्या मंजुळेला तसें नाहीं तर असें त्याला पुनर्जीवन देतां आलें, हें मी माझें भाग्य समजतों. " हें बोलणें ज्यादिवशीं झालें त्याच्यानंतर फार दिवस बाळ जगला नाहीं. एकेदिवशीं संध्याकाळीं त्याच्या जीव बराच घाबरूं लागला. मी व मंजुला त्याचेजवळ बसलों होतों. डॉक्टर आले व त्यांनीं कांहीं औषध दिलें. बाळची मुद्रा शांत दिसूं लागली. त्यानें आपल्या उजव्या हातांत मजुळेचा हात घेतला व डाव्या हातांत माझा घेतला. नंतर बराच वेळ समोर ठेवलेल्या श्रीकृष्णाच्या श्याम-सुंदर मुर्तीकडे पाहात व तोंडानें ' ॐ ' म्हणत त्यानें एकवेळ माझ्याकडे बघितलें व नंतर मंजुळेकडे बघत म्हणाला, " मंजुळा, आतां येतों अं..........."

बाळनें खरोखरच आमचा शेवटला निरोप घेतला. कारण त्याच्या तोंडांतून पुढे शब्द निघेनात. कांहीं वेळानें त्याचा—ध्येयासाठीं धड-पडणारा—आत्मा नश्वर देह टाकून सत्स्वरूपीं लीन झाला. मंजुळा एखाद्या मूर्तीप्रमाणें तटस्थ उभी होती. तिच्या डोळ्यांतून अश्रूंची सारखी झिरपणी होत होती.

× × × ×

—८—

यानंतरची हकिकत म्हणजे मंजुळेसंबंधानें. बाळ आणि मंजुळा यांच्या चरित्राचें अवलोकन आणि स्मरण करीत असतांना, मला राहून राहून विधिघटनेचें मोठें आश्चर्य वाटतें. जगाचा कारभार चालविणारी ही सर्वतंत्र स्वतंत्र अशी सुलतानी बाण्याची शक्ति तरी कोण आहे ? कांहीं कळत नाहीं. मनाच्या समाधानाकरितां लागल्यास परमेश्वराला प्रेमस्वरूप म्हणावें. परंतु प्रत्यक्ष व्यवहारांत मात्र उलट अनुभव येतो. आपण हिंदुलोक कर्ममीमांसेनें सर्वच कारणांची उपपत्ति लावितों—त्याप्रमाणें याचीहि लावितां येते व येईल. पण उपपत्ति निराळी आणि हृदयाचें समाधान निराळें.

बाळ गेल्यानंतर मंजुळेच्या जीवनांतील मुख्य झराच अटला. तिचा आनंद हरपला. तिचें सुख मालवलें. तिची शांति ढळली. आणि तिची कलादेखील लुप्तप्राय झाली. मंजुळेचा चेहेरा फिकट दिसूं लागला. आंतील जीवनज्योति बारीक होऊं लागली. आणि कांहीं दिवसांनीं ती पूर्णपणें विझली ! ! मंजुळा बाळला भेटायला गेली असेल काय ? ? ?

× × × ×

—९—

मी माझ्या मित्राची करुणकहाणी लिहिणारच नव्हतों. आणि त्यांत लिहिण्याजोगें तरी काय आहे ? उलट बाळची आणि मंजुळेची आठवण होऊन आतांच माझे डोळे पाण्यानें भरले आहेत. त्यांत लिहीत असतांना तर कितीतरी दुःख होतें. पण, कुठल्याशा एका इंग्रजी

कवीनें—मला वाटतें तो फिझजेराल्ट असावा—म्हटलें आहे कीं ' जगांत ज्यांना अपयश मिळालें, किंवा जे तसेच ईश्वरचरणीं किंवा लोकांच्या हातांत जाण्यापूर्वी झाडावरच्या झाडावर कोमेजून गेले, त्यांचींच चरित्रें पुष्कळशीं लिहिलीं जावींत. ' आणि त्याचें म्हणणें खरेंहि आहे. कारण अशाच चरित्रांतून ध्येयसिद्धीकरितां होणारी अंतरात्म्याची धडपड आणि तळमळ पहावयास सांपडतें. कार्यकर्त्या व कार्यत्रि-न्मुख झालेल्या मंडळींना असलींच चरित्रें उद्बोधक वाटतात. आणि माझी ही भावना दृढ असल्यामुळेंच मला अप्रिय परंतु माझ्या इतर देशबांधवांना हितकर असें हें कार्य करण्यास मीं प्रवृत्त झालों. ह्यावेळीं मला माझ्या बाळची आठवण होते. कारण त्यानेंच मला ज्ञानाची गोडी लावून दिली.

ता. १०-१२-२६ बडोदें वि. पां. दांडेकर.